www.yuvakadhar.in E mail - dainikyuvakaadhar@gmail.com facebook : yuvakadhar

दैनिक तरुणांचा बुलंद आवाज मराठी

# युवक आधार

मुख्य संपादक - भारती संतोष आमले उपसंपादक - श्री विलास मनोहर गायकवाड कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे निवासी संपादक- श्री राकेश जनार्दन पाटील सह संपादक - मुकुंद कांबळे

वर्ष : २ अंक : 339 सोमवार दि. 25 ऑगस्ट २०२५ किंमत : ४ रु पृष्ठ : 6 RNI MAHMAR/2023/89514




# मुंबई ते सावंतवाडी रोड, नागपूर विशेष रेल्वेगाडी

**मुंबई** : गणेशोत्सवानिमित्त आतापर्यंत ३८० विशेष रेल्वेगाड्या चालवण्याचा निर्णय रेल्वेने घेतला असून त्यापैकी अनेक रेल्वेगाड्या धावण्यास सुरुवात झाली. मध्य रेल्वेने आतापर्यंत ३०६ गणपती विशेष रेल्वेगाड्या चालवण्याचे जाहीर केले आहे. त्यात आणखी दोन विशेष रेल्वेगाड्यांची भर पडली आहे. मुंबई ते नागपूर दरम्यान दोन विशेष रेल्वेगाड्या चालवण्यात येणार आहेत.

गाडी क्रमांक ०११०१ विशेष रेल्वेगाडी २६ ऑगस्ट रोजी रात्री १२.३० वाजता छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनसवरून निघेल आणि त्याच दिवशी दुपारी ३.५० वाजता नागपूरला पोहोचेल.

गाडी क्रमांक ०११०२ विशेष रेल्वेगाडी २६ ऑगस्ट रोजी दुपारी ४.२० वाजता नागपूरहून निघेल आणि दुसऱ्या दिवशी सकाळी ८.२५ वाजता छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनसला पोहोचेल. या रेल्वेगाडीला दादर, ठाणे, कल्याण, इगतपुरी, नाशिक रोड, मनमाड, जळगाव, भुसावळ, मलकापूर, शेगाव, अकोला, मूर्तिजापूर, बडनेरा, धामणगाव



आणि वर्धा येथे थांबा देण्यात येणार आहे. या रेल्वेगाडीची द्वितीय वातानुकूलित श्रेणीचा एक डबा, तृतीय वातानुकूलित श्रेणीचे दोन डबे, सहा शयनयान डबे, ७ सामान्य द्वितीय श्रेणी डबे, दोन जनरल सेकंड क्लास कम गार्ड ब्रेक व्हॅन अशी संरचना असेल. या रेल्वेगाडीचे आरक्षण सर्व संगणकीकृत आरक्षण केंद्रांवर आणि आयआरसीटीसीच्या संकेतस्थळावर करता येणार आहे, अशी माहिती मध्य रेल्वे प्रशासनाने दिली.

**लोकमान्य टिळक टर्मिनस ते सावंतवाडी रोड द्विसाप्ताहिक विशेष रेल्वेगाडी**

गाडी क्रमांक ०११३१ द्वैसाप्ताहिक विशेष रेल्वेगाडी प्रत्येक गुरुवारी आणि रविवारी २८ ऑगस्ट, ३१ ऑगस्ट, ४ सप्टेंबर आणि ७ सप्टेंबर रोजी लोकमान्य टिळक टर्मिनस येथून सकाळी ८.४५ वाजता सुटेल आणि त्याच दिवशी रात्री १०.२० वाजता सावंतवाडी रोड येथे पोहोचेल. या रेल्वेगाडीच्या एकूण ४ फेऱ्या चालविण्यात येतील. गाडी क्रमांक ०११३२ द्विसाप्ताहिक विशेष रेल्वेगाडी प्रत्येक गुरुवारी आणि रविवारी २८ ऑगस्ट, ३१ ऑगस्ट, ४ सप्टेंबर आणि ७ सप्टेंबर रोजी सावंतवाडी रोड येथून रात्री ११.२० वाजता सुटेल आणि दुसऱ्या दिवशी दुपारी १२.३० वाजता लोकमान्य टिळक टर्मिनस येथे पोहोचेल. या गाडीच्या एकूण ४ फेऱ्या चालविण्यात येतील.

या रेल्वेगाडीला ठाणे, पनवेल, पेण, रोहा, माणगाव, खेड, चिपळूण, सावर्डा, आरवली रोड, संगमेश्वर रोड, रत्नागिरी, आडवली, विलवडे, राजापूर रोड, वैभववाडी रोड, नांदगाव रोड, कणकवली, सिंधुदुर्ग, कुडाळ आणि झाराप येथे थांबा देण्यात आला आहे. या रेल्वेगाडीची २ वातानुकूलित तृतीय श्रेणी डबे, १२ शयनयान, ६ सामान्य द्वितीय श्रेणी डबे आणि २ द्वितीय आसन व्यवस्था असलेले गार्ड ब्रेक व्हॅन अशी संरचना असेल.

## गणेशोत्सवाच्या अनुषंगाने पोलीस ठाणे हद्दीतील विसर्जन मार्ग, विसर्जन घाट परिसराचा पाहणी दौरा

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**

27 ऑगस्ट ते दिनांक 6 सप्टेंबर दरम्यान गणेशोत्सव सण साजरा होणार असुन कायदा व सुव्यवस्थेच्या अनुषंगाने 23 ऑगस्ट सहा. पोलीस आयुक्त, पनवेल, भाउसाहेब ढोले यांनी पनवेल महानगरपालिका, सार्वजनिक बांधकाम विभाग, अग्निशमन विभाग, तसेच महावितरणच्या संबंधित अधिका–यांसमवेत पनवेल शहर पोलीस ठाणे हद्दीतील विसर्जनाचे मार्ग, विसर्जन घाट परिसराचा संयुक्त पाहणी दौरा केला.



या दौ–या दरम्यान वडाळे तलाव विसर्जन घाट, उरण नाका–कोळीवाडा विसर्जन घाट, से.5 करंजाडे विसर्जन घाट तसेच गाढी नदी तक्का विसर्जन घाट परिसराची पाहणी करून संबंधित अधिका–यांकडून नमुद ठिकाणी करण्यात येत असलेल्या कारवाईचा आढावा घेवून आवश्यक त्या सुचना दिल्या. तसेच लाईन आळी शिवाजी रोड, आदर्श चौक, विरूपाक्ष मंदिर परिसर, कर्मवीर चौक, कर्नाळा भाजी मार्केट सर्कल, टपाल नाका, उरण नाका या विसर्जन मार्गाची पाहणी करून विसर्जन मार्गावरील विद्युत केबल व रस्त्यांवरील खड्ड्यांबाबत उपस्थित संबंधित विभागाचे अधिकारी यांना योग्य ती कारवाई करण्याबाबत सूचित केले.

या संयुक्त पाहणी दौ–या दरम्यान पनवेल शहर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन ठाकरे यांच्यासह पनवेल महानगरपालिका बांधकाम विभागाचे उप अभियंता सुधीर साळुंखे, ज्यु. इंजिनियर किरण पाटील, पनवेल महानगरपालिका ड–प्रभाग अधिकारी रोशन माळी, लिपिक तुषार कामटेकर, पनवेल महानगरपालिका अग्निशमन विभागाचे उप अग्निशमन अधिकारी फत्तेसिंग गायकवाड, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कनिष्ठ अभियंता उमेश मासाळ, महावितरणचे सहा. अभियंता विजय मिश्रा तसेच इतर अधिकारी, कर्मचारी हजर होते. (फोटो)

# मुलुंड येथे मंगळागौर उत्सवाचे जल्लोषात आयोजन

**दैनिक युवक आधार**
**किशोर गुडेकर मुंबई विभाग प्रतिनिधी प्रमुख**

मुलुंड Be in Group Foundation च्या संस्थापक रोहिणी ताई जाधव यांच्या पुढाकाराने, दरवर्षीप्रमाणे यंदाही दिनांक 20 ऑगस्ट 2025 रोजी भव्य मंगळागौर उत्सवाचे आयोजन करण्यात आले.

या कार्यक्रमाची सुरुवात पारंपारिक पद्धतीने मंगलाष्टक पठण व दीपप्रज्वलनाने झाली. त्यानंतर उपस्थित मान्यवरांच्या स्वागताने कार्यक्रमाचा शुभारंभ झाला.

संपूर्ण सभागृह पारंपारिक वेशभूषा परिधान केलेल्या महिलांच्या उपस्थितीने मंगलमय झाले होते. विविध पारंपरिक खेळ, फुगडी–झिम्मा, गाणी व नृत्य यांच्या माध्यमातून महिलांनी मनसोक्त आनंद लुटला.

या प्रसंगी वंदना पाचारणे व मंगला पवार यांना उत्कृष्ट पारंपारिक वेशभूषा, तसेच वैशाली पवार यांना उत्कृष्ट नृत्य सादरीकरण केल्याबद्दल सन्मानचिन्ह प्रदान करण्यात आले.




याशिवाय लता खराडे, चित्रा मोरे, योगिता गायकवाड, निकिता म्हात्रे, दीपिका झुंजारराव, प्रिती सिंग, ललिता सोरटे, कामिनी देशमुख, रेश्मा बोडारे, वंदना या सहभागी महिलांना मंगळागौर खेळांमध्ये उत्साहपूर्ण सहभागाबद्दल पारितोषिके प्रदान करण्यात आली.

महिलांनी सांगितले की, “अशा उपक्रमांमुळे संस्कृती जपली जाते, एकत्र येण्याची संधी मिळते आणि आनंदी वातावरण तयार होते.”

या उत्सवाचे वैशिष्ट्य म्हणजे महिलांचा उत्स्फूर्त सहभाग, पारंपरिक वातावरण आणि सामाजिक ऐक्याची भावना.

कार्यक्रमाची सांगता सामूहिक आरतीने व एकमेकांना शुभेच्छा देत करण्यात आली.

# संत सेना नाभिक समाज मंडळ कामोठे चा ११,वर्धापन दिन उत्साहात संपन्न

**दैनिक युवक आधार**
**कामोठे/आण्णासाहेब आहेर**

कामोठेत संत सेना नाभिक समाज मंडळाच्या ११व्या वर्धापन दिनानिमित्त कराडी समाज हॉल येथे सकाळी सत्यनारायण पूजा व पालखी सोहळा व रॅली व सायंकाळी वर्धापन दिन सोहळा शनिवार दिनांक २३,ऑगस्ट रोजी उत्सवात संपन्न झाला सदर सोहळ्याला केंद्रीय कृषी कल्याण राज्यमंत्री रामनाथ ठाकूर यांच्या कन्या नमिता ठाकूर व त्यांचे पती रंजीत कुमार यांची प्रमुख उपस्थित लाभली तसेच पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर,आमदार विक्रांत पाटील, कोकण म्हाडा माजी सभापती बाळासाहेब पाटील,युवा नेते प्रीतम म्हात्रे,दी बा पाटील यांचे सुपुत्र अतुल पाटील,भाजपचे सुशील शर्मा,शिवसेनेचे शहराध्यक्ष सुनील गोवारी यांच्या प्रमुख उपस्थिती सोहळा आकर्षक व प्रेरणादायी ठरला केंद्रीय कृषी एवं शेतकरी कल्याण राज्यमंत्री रामनाथ ठाकूर हे केंद्रीय कामकाजात व्यस्त असल्यामुळे ते उपस्थित राहू शकले नाही परंतु त्यांनी व्हिडिओच्या माध्यमातून वर्धापन दिनाला शुभेच्छा देत, सर्वांनी शिकलं पाहिले सांगत समाजाला बोधयुक्त मार्गदर्शन केले भारतरत्न जननायक कर्पूरी ठाकूर यांच्याकडून प्रेरणा घेऊन परिवार व देशाचा विकास घडेल असे मत आमदार प्रशांतदादा ठाकूर यांनी व्यक्त केले, छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळातील नाभिक समाजाचा नावलौकिक सांगत गावगाडा चालवताना बारा बलुतेदारांचे महत्त्व आमदार विक्रांतदादा पाटील यांनी सांगत केंद्र शासन व राज्य शासनाचे व्यवसायाला पाठबळ असल्याचे मत व्यक्त केले,सदर सोहळ्यात प्रसिद्ध "मिथिला पाग" घालून उपस्थित मान्यवरांचा सन्मान करण्यात आला संत सेना नाभिक समाजातील व्यवसायिकांना काही सहकार्य लागेल ते करू असे मत शिवसेनेचे कामोठे शहराध्यक्ष सुनील गोवारी यांनी व्यक्त केले, भाजपचे सुशील शर्मा यांनीही संत सेना नाभिक समाज मंडळाच्या कार्य मनोगत आतून व्यक्त केले सदर कार्यक्रमाला माजी नगरसेवक भाजपाचे कामोठे शहर




मंडळ अध्यक्ष विकास घरत,नगरसेवक विजय चिपळेकर,नगरसेविका हेमलता गोवारी,भाजपाच्या जिल्हा चिटणीस विद्याताई तामखेडे,रवींद्र जोशी,हर्षवर्धन पाटील,जितेंद्र तिवारी,हीरा हमराही(गायक),ए सी मिश्रा सुजित पुजारी,नानासाहेब मगदूम,ॲड.जय पावणेकर,मनोहर शिंगाडे आदित्य भगत यासह विविध क्षेत्रातील मान्यवर यांची उपस्थिती लाभली संत सेना नाभिक समाजाचे पदाधिकारी तसेच पनवेल,कळंबोली,खांदा कॉलनी,कोपरखैरणे,उरण,उलवे येथील समाज बांधवांची उपस्थिती उल्लेखनीय राहिली, संत सेना नाभिक समाज मंडळाचा वर्धापन दिन सोहळा व्यावसायिक पाठबळ व सामाजिक एकतेसाठी प्रेरणादायी राहिला

# पनवेलचा ओंकारेश्वर आगमन सोहळा संपन्न

## श्री.प्रितमदादा म्हात्रे यांची प्रमुख उपस्थिती

**दैनिक युवक आधार**
**पनवेल वार्ताहर**

गणेशोत्सवाची पर्वणी म्हणजे भक्ती, उत्साह, एकोपा आणि आनंदाचा महापर्व. त्याचाच भाग म्हणून ओंकार मित्र मंडळ, प्रभू आळी, पनवेल आयोजित ३५ वा गणेश आगमन सोहळा शनिवार दि. २३ ऑगस्ट रोजी संध्याकाळी ५ वाजता दिमाखदार व भक्तिरसात संपन्न झाला.

**३५ वर्षांचा अखंड प्रवासात**

गेल्या तीन दशकांहून अधिक काळ ओंकार मित्र मंडळ, प्रभू आळी हे पनवेलमधील एक आदर्श मंडळ ठरले आहे. भक्ती, संस्कार, समाजकार्य आणि उत्सव यांचा सुंदर संगम साधत लोकांना एकत्र आणण्याचे कार्य या मंडळाने सातत्याने केले आहे.

**श्री.प्रितम जनार्दन म्हात्रे**
**(मा.विरोधी पक्षनेते)**
**पनवेल महानगरपालिका**

यंदा मंडळाने बाप्पाचे श्रीकृष्णस्वरूपातील आगमन करून पनवेलकरांसाठी खास आकर्षण निर्माण केले. संपूर्ण प्रभू आळी परिसर फुलांच्या सजावटीने, रोषणाईने व ढोल–ताशांच्या गजराने नटला होता. भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून बाप्पाचे दर्शन घेतले. या आगमन सोहळ्यास मंडळाचे आधारस्तंभ प्रितमदादा म्हात्रे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्यांच्या मार्गदर्शनाखाली गेली अनेक वर्षे मंडळ समाजकार्य आणि सांस्कृतिक उपक्रम राबवत असून, पनवेलमध्ये गणेशोत्सवाच्या माध्यमातून भक्तीबरोबर समाजसेवेचा संदेश देत आहे. मंडळाचे सर्व पदाधिकारी आणि स्वयंसेवक यांच्या कुशल नियोजनामुळे सोहळा यशस्वीरीत्या पार पडला.महिला मंडळ व सर्व कार्यकर्त्यांनी मोठ्या उत्साहाने सहभाग नोंदवला.

**समाजोपयोगी उपक्रमांची परंपरा**

मागील ३५ वर्षांपासून ओंकार मित्र मंडळ धार्मिक उत्सवासोबतच सामाजिक कार्यालाही प्राधान्य देते. बाप्पासाठी हार–फुलं न आणता “एक वही – एक पेन” ही संकल्पना राबवली जाते. जमा झालेली शैक्षणिक साहित्य गरजू विद्यार्थ्यांना दिली जातात. दरवर्षी अनाथाश्रमांना भेट देऊन अन्नदान करण्याचा उपक्रमही राबवला जातो. प्रितमदादा म्हात्रे यांच्या मार्गदर्शनाखाली वृक्षारोपण, स्वच्छता मोहिम व इतर सामाजिक उपक्रम सातत्याने सुरू आहेत अशी माहिती मंडळाचे अध्यक्ष निखिल राम फडतरे यांनी दिली. या मंगलमय सोहळ्यात श्री.प्रितम म्हात्रे यांनी सपत्नीक सौ. ममता म्हात्रे यांच्यासह उपस्थित राहून बाप्पाचे दर्शन घेतले.



# जासई विद्यालयातील गुरुकुल मुलांना दिले सायबर सुरक्षेचे धडे !!

**दैनिक युवक आधार**
**जिल्हा प्रतिनिधी प्रमुख/एम.डी.भोईर**

रयत शिक्षण संस्थेच्या श्री छत्रपती शिवाजी हायस्कुल व लोकनेते दि.बा.पाटील ज्युनिअर कॉलेज दहागांव,विभाग जासई ,ता. उरण जि.रायगड या विद्यालयात २३ ऑगस्ट २०२५ रोजी गुरुकुलच्या विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षा या विषयावर विद्यालयाच्या माझी विद्यार्थी तसेच जासई गावची सुपुत्री श्रीम.म्हात्रे अमिषा अशोक मॅडम मुंबई पोलिस कॉन्स्टेबल यांनी मुलांना सायबर सुरक्षेचे महत्त्व सांगितले. त्याचबरोबर सायबर गुन्ह्यांमध्ये आपण कसे अडकतो व आपली फसवणूक होते याची माहिती सांगितली.मोबाईलच्या माध्यमातून अनेक मोहांना कसे बळी पडतो आणि आपले आर्थिक नुकसान होते तसेच त्यासाठी मुलांना सायबर क्रमांक आणि आपत्कालीन क्रमांक याविषयी तातडीची गरज ओळखून त्यासंदर्भात आपण तक्रार नोंदवू शकतो ,अशा विविध विषयांवर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.याप्रसंगी शाळेच्या प्राचार्या सौ.म्हात्रे के.जी.मॅडम यांनी माजी विद्यार्थी श्रीम.म्हात्रे अमिषा मॅडम यांचे स्वागत व सत्कार केला.तसेच उपमुख्याध्यापक श्री कुटे व्ही.के.सर ,पर्यवेक्षिका सौ.मुकादम के.एस.मॅडम ,गुरुकुल



प्रमुख श्री भोईर के.एम.सर ,तसेच शिक्षकवृंद उपस्थित होते.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शाळेचे हरहुन्नरी शिक्षक श्री गाताडी एस.बी.सर व आभार श्रीम.घरत एम.के.मॅडम यांनी केले.

## पिंपळगाव बसवंत नगर परिषद निकृष्ट दर्जाचे रस्ते काम दुरुस्त करा अन्यथा तीव्र जन आंदोलनाचा इशारा संतोष सुरडकर.

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी कृष्णा गायकवाड (पिंपळगाव बसवंत)**



पिंपळगाव बसवंत नगरपरिषद हद्दीतील अंबिका नगर, भाऊसाहेब नगर,श्री राघोजी भांगरे नगर( कोळीवाडा ) डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर नगर (राजवाडा) तसेच दगु नाना मोरेनगर येथील स्टेप इन स्कूल ते तुळजाभवानी मंदिराकडे जाणारा रस्ता दैनीय अवस्था झालेली आहे निकृष्ट दर्जाच्या रस्त्यांमुळे अपघात होण्याच्या प्रमाण वाढलेले आहे. कदाचित रस्त्यात अपघात झाला तर यास जबाबदार कोण याची जबाबदारी नगरपरिषद घेईल का यासंदर्भात पिंपळगाव बसवंत नगर परिषदेला निवेदन देण्यात आले आहे . निर्भय महाराष्ट्र पार्टी निफाड तालुका अध्यक्ष व महात्मा रावण किंग फाउंडेशन दत्ताभाऊ झनकर यांनी वेळोवेळी नगरपरिषदेला निवेदन देऊ नहीं रस्ता दुरुस्ती झालेले नाही. लवकरात लवकर रस्ता दुरुस्तीकरण करावे अन्यथा तीव्र जन आंदोलनाचा इशारा महात्मा रावण किंग फाउंडेशन व निर्भय महाराष्ट्र पार्टी याच्या वतीने देण्यात आलेला आहे. याप्रसंगी निर्भय महाराष्ट्र पार्टी निफाड तालुका अध्यक्ष संतोष सुरवडकर पिंपळगाव बसवंत शहराध्यक्ष फारुख भाई शेख आदिवासी उलगुलान सेना नाशिक जिल्हा अध्यक्ष व महात्मा रावण किंग फाउंडेशन चे संस्थापक दत्ताभाऊ झनकार व इतर कार्यकर्ते उपस्थित होते.

## गणेशभक्तांना पथकर/टोल माफी स्टिकर पनवेल आरटीओमध्ये उपलब्ध

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**

२०२५ च्या गणेशोत्सव कालावधीत कोकणात जाणाऱ्या गणेशभक्तांना गणेशोत्सव निमित्त पथकर/टोल माफी व इतर सोई सुविधा उपलब्ध करून देण्याबाबतचा शासन निर्णय घेण्यात आलेली आहे. २०२५ च्या गणेशोत्सवाकरीता कोकणात जाणाऱ्या भाविकांच्या वाहनांना पथकरातून सूट देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्याअनुषंगाने २३ ऑगस्ट ते ८ सप्टेंबर या कालावधीत मुंबई बेंगलोर राष्ट्रीय महामार्ग ( राम - ४८), मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग (राम-६६) वरील व इतर सार्वजनीक बांधकाम विभागाच्या तसेच महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या अखत्यारीतील रस्त्यांवरील पथकर नाक्यांवर कोकणात जाणाऱ्या गणेशोत्सव भाविकांच्या वाहनांना तसेच महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या बसेसना पथकरातून सवलत देण्यात आलेली आहे.

"गणेशोत्सव २०२५" कोकण दर्शन अशा आशयाचे स्टीकर्स स्वरूपाचे पथकर माफी पासेस त्यावर गाडी क्रमांक, चालकाचे नांव, असा मजकूर नमूद करून ते स्टीकर्स नमूद पासेची सुविधा प्रादेशिक परिवहन कार्यालय, पनवेल (RTO PANVEL) कार्यालयामध्ये उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. अर्जदारांना विशेष सुविधा म्हणून QR CODE द्वारे नमूद पासेस करीता अर्ज करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. तरी या सुविधेचा लाभ जास्तीत जास्त लोकांनी घ्यावा असे आवाहन करण्यात आले आहे.

## युवा मोर्चाच्यावतीने गणपती सजावट स्पर्धा

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (प्रतिनिधी)**

गणेशोत्सवानिमित्त भारतीय जनता युवा मोर्चा पनवेल शहरच्यावतीने 'गणपती सजावट स्पर्धा २०२५' स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेतील एकूण विजेत्यांना २५ हजार रुपयांची बक्षिसे तसेच आकर्षक चषक व प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. स्पर्धक हा पनवेल शहरातील रहिवासी असणे बंधनकारक असेल, तसेच थर्माकोल वापर केलेली सजावट स्पर्धेसाठी ग्राह्य धरली जाणार नाही. या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी ८४३३५१३५४० या क्रमांकावर घरातील श्रीगणेशाचे व सजावटीचे फोटो व्हाट्सअँप करावे त्यासाठी अंतिम नोंदणीची अंतिम तारीख २८ ऑगस्ट आहे. अधिक माहितीसाठी कोमल कोळी ९८२०८९८८०६, शुभम कांबळे ९८६७५४७१३४, अनिमेश पटवर्धन ९०२९०८५००८ किंवा स्वरूप मुंबईकर ७५०६६३७४३७ यांच्याशी संपर्क साधावा.

# धर्माबादेत नगरसेवकपदाच्या शर्यतीला वेग

## प्रभाग रचना जाहीर होताच भावी नगरसेवकाची धावपळ"

**दैनिक युवक आधार**
**धर्माबाद (प्रतिनिधी) गिरमाजी सुर्यकार**

धर्माबाद नगरपरिषदेची नवीन प्रभाग रचना अखेर जाहीर झाली असून शहरातील राजकीय वातावरणात मोठी खळबळ उडाली आहे. नव्या रचनेनुसार प्रभागांची लोकसंख्या, भौगोलिक विभागणी, तसेच आरक्षणाचा ताळमेळ साधण्यात आला आहे. यामुळे अनेकांचे राजकीय गणित बिघडले असून काही इच्छुकांसाठी नवीन दालने खुली झाली आहेत.

राजकीय पक्षांच्या गोटात उमटणाऱ्या प्रतिक्रिया लक्षवेधी ठरत आहेत. आरक्षण पद्धतीत काहीशा प्रमाणात बदल झाल्याने काही विद्यमान नगरसेवकांना स्वतःचा गड सोडावा लागणार आहे, तर काहींना नवीन भागात आपले राजकीय पाय रोवावे लागतील. यामुळे प्रभाग रचनेनंतर अनेकांच्या चेहऱ्यावर चिंता स्पष्ट दिसत आहे, तर काहींनी मात्र उत्साह व्यक्त केला आहे.

राजकीय पातळीवर पाहता, पुढील काही दिवसांत भावी नगरसेवकांच्या इच्छुकांची धावपळ वाढणार असून, विविध राजकीय पक्षांतर्फे गटबाजीला देखील उधाण येण्याची शक्यता आहे. निवडणुकीच्या तोंडावर ही प्रभाग रचना जाहीर झाल्याने उमेदवार निवड आणि प्रचार धोरण निश्चित करताना पक्षांना मोठे आव्हान उभे राहणार आहे. धर्माबादच्या नगरपरिषदेतील ही प्रभाग रचना जाहीर होताच, शहरातील वातावरण तापले असून, येत्या निवडणुकीत कोण बाजी मारतो याकडे संपूर्ण धर्माबादचे लक्ष लागून राहणार आहे.

शहरातील प्रभागांची संख्या, लोकसंख्या व आरक्षणात बदल झाल्याने सर्वच पक्षांच्या नेत्यांना व इच्छुक उमेदवारांना आपले



नवीन राजकीय गणित मांडावे लागणार आहे.

*काँग्रेस*

काँग्रेसचा पारंपरिक प्रभाव असलेल्या काही भागांमध्ये प्रभाग आरक्षणामुळे विद्यमान नगरसेवकांचे पत्ते कट होण्याची शक्यता आहे. पक्षाचे पारंपारिक मतदार स्वतःकडे असले तरीही तरुण नेतृत्वाला संधी देण्याबाबत जनतेतून अपेक्षा आहे. गटबाजी कमी केली तर काँग्रेसकडे पुन्हा ताकद दाखवण्याची संधी आहे.

*भाजप*

भाजपने मागील दोन निवडणुकांमध्ये धर्माबादमध्ये हळूहळू पाय रोवले. नवीन प्रभाग रचनेत काही प्रभाग महिला आरक्षणात गेल्याने भाजपला महिला उमेदवार पुढे आणण्याची संधी मिळाली आहे. संघटन मजबूत असले तरी स्थानिक स्तरावरील गटबाजी व बंडखोरी हेच त्यांच्यासाठी डोकेदुखी ठरू शकते.

*राष्ट्रवादी काँग्रेस*

राष्ट्रवादी काँग्रेसकडे काही ठिकाणी मजबूत गटबांधणी असली मतदारांना आपल्याकडे टिकून ठेवणे हे पक्षाकडे आव्हान आहे. यामुळे नवीन चेहरे उतरवावे लागतील. योग्य उमेदवार निवडण्यात यश आले तर राष्ट्रवादी किंगमेकरची भूमिका बजावू शकते.

**शिवसेना (दोन्ही गट)**

शिवसेना व शिंदे गटामध्ये सध्या बाजी कोण मारणार यामध्ये स्पर्धा आहे. दोन्ही शिवसेना वेगळे झाल्याने शिवसेनेचे पारंपारिक मतदार कोणाच्या पथ्यावर पडतात हे पाहणे महत्त्वाचे ठरेल.

**अपक्ष व स्थानिक गट**

प्रभाग रचना बदलल्यावर सर्वाधिक संधी अपक्ष उमेदवारांना निर्माण झाल्या आहेत. स्थानिक नेते, समाजकार्याशी जोडलेले चेहरे व जाती-धर्मीय समीकरणांवर प्रभुत्व असलेले उमेदवार प्रभागात थेट जनतेशी संपर्क साधून मतदारांचा विश्वास पटकावू शकतात.

**नागरिकांच्या अपेक्षा**

दरम्यान, शहरातील नागरिकही या घडामोडीकडे उत्सुकतेने पाहत आहेत. नागरिकांचा भर मात्र विकासाच्या मुद्द्यावर आहे. *"प्रभाग बदलला, उमेदवार बदलला तरी आमच्या परिसरातील रस्ते, पाणी, स्वच्छता आणि मूलभूत सुविधांचा प्रश्न सुटला पाहिजे,"* अशी भावना मोठ्या प्रमाणावर व्यक्त होत आहे

## १७ वर्षे आतील राज्यस्तरीय टेनिस क्रिकेट अजिंक्यपद स्पर्धेत ठाणे जिल्हाला प्रथम पारितोषिक

### द्वितीय क्रमांक सिंधुदुर्ग ,तृतीय क्रमांक सोलापूर जिल्हा

**दैनिक युवक आधार**
**नाशिक जिल्हा प्रतिनिधी राहुल कुलकर्णी**

नाशिक /- टेनिस क्रिकेट असोसिएशन महाराष्ट्र व सोलापूर जिल्हा टेनिस क्रिकेट असोसिएशन आयोजित १७ वर्षे आतील राज्यस्तरीय अजिंक्यपद स्पर्धा अकलूज येथील विजयसिंह मोहिते पाटील क्रीडा संकुल येथे उत्साहात संपन्न झाली त्यामध्ये प्रथम क्रमांक ठाणे जिल्हा ,द्वितीय क्रमांक सिंधुदुर्ग जिल्हा,तृतीय क्रमांक सोलापूर जिल्हा,चतुर्थ क्रमांक सातारा जिल्हा यांनी मिळवल्याबद्दल त्यांचे राज्यातून सर्वत्र अभिनंदन होत आहे या उद्घाटन प्रसंगी भारतीय टेनिस क्रिकेट असोसिएशनच्या महासचिव सौ .मिनाक्षी गिरी व सोलापूर जिल्ह्याचे युवा नेते मा. श्री सयाजीराजे मोहिते पाटील,

महाराष्ट्र उपाध्यक्ष विलास गिरी, सहसचिव चंद्रकांत तोरणे , महिला अध्यक्षा धनश्री गिरी,जिल्हा सचिव विलास गायकवाड, सांगली जिल्हा सचिव, विजय बिराजदार, सिद्धेश गुरव, कुणाल हळदनकर, संदीप खलाणे, शेख शफी, सुशील तांबे, महेश मिश्रा, आनंद गिरी इत्यादी व क्रीडाप्रेमी उपस्थित होते

यावेळी राज्यतून एकूण ३२ संघांनी सहभाग नोंदवला तसेच भारतीय टेनिस क्रिकेट असोसिएशन महासचिव सौ मिनाक्षी गिरी यांनी विद्यार्थ्यांना टेनिस क्रिकेट खेळाबद्दल माहिती व नियम तसेच १३ ते १७ या वयात होत असलेल्या Dil लिंग ची माहिती सांगितली. १७वर्षे आतील स्पर्धेचा




अंतिम सामना सिंधुदुर्ग विरुद्ध ठाणे ग्रामीण यांच्यात होऊन ठाणे संघाने उत्कृष्ट खेळ करत या स्पर्धेचे विजेतेपद प्राप्त केले तसेच द्वितीय क्रमांक सिंधुदुर्ग,तृतीय क्रमांक सोलापूर व चतुर्थ क्रमांक सातारा तसेच मुलींच्या संघामध्ये प्रथम क्रमांक मुंबई उपनगर,द्वितीय क्रमांक अमरावती तसेच बेस्ट बॉलर-निनाद सिंधुदुर्ग ,बेस्ट बॅट्समन-रामकृष्ण सिंधुदुर्ग- सिरीज रामकृष्ण- सिंधुदुर्ग मुली-बेस्ट बॅट्समन ,फारिया मुंबई उपनगर बेस्ट बॉलर-जुई नासिक, वुमन ऑफ द सिरीज -फारिया मुंबई उपनगर यांना मिळवल्याबद्दल भारतीय टेनिस क्रिकेट असोसिएशनच्या अध्यक्ष कन्हैया गुजर व महासचिव मीनाक्षी गिरी , महाराष्ट्र उपाध्यक्ष विलास गिरी , महिला अध्यक्ष धनश्री गिरी,नाशिक जिल्हा सचिव विलास गायकवाड यांनी अभिनंदन केले

सदर स्पर्धेत विजय उमरे. लखन देशमुख, सोमा बिरादार, दर्शन थोरात, , महेंद्र देशमुख, मानस पाटील, धनश्री गिरी, साक्षी गणे, रूतुजा तोरडमल, रोहिणी सकटे, धनंजय लोखंडे, सुनील मोर्यो स्वप्निल सांगली यांनी पंच म्हणून काम पार पाडले.. राष्ट्रीय टेनिस क्रिकेट अजिंक्यपद स्पर्धा मथुरा येथे होत आहे या स्पर्धेत महाराष्ट्र, विदर्भ आणि मुंबई संघ सहभागी होणार आहे.

## शेख मन्सूर यांचा कुस्ती स्पर्धेत घवघवीत यश मिळवल्याबदल वसंत शिक्षण प्रसारक मंडळ चव्हाणवाडी च्या वतीने गौरव

**दैनिक युवक आधार**
**नांदेड प्रतिनिधी चंद्रशेखर वाघमारे पपु निवळीकर**

नांदेड - स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाशी सवलग्नित असलेली कै. भीमराव चव्हाण कला व विज्ञान महाविद्यालय चव्हाणवाडी ता.मुखेड येथील बी ए प्रथम वर्गात शिकत असलेला विद्यार्थी शेख मन्सूर यांनी विद्यापीठ व पंडित दीनदयाळ महाविद्यालय देवणी यांच्या संयुक्त विद्यमाने पार पडलेल्या दिनांक 18 /8/ 2025 रोजी कुस्ती स्पर्धेत बी झोन मध्ये 61 किलो वजन गटात प्रथम क्रमांक पटकावला तर सेंट्रल विभागीय स्तरावर तिसरा क्रमांक पटकावत महाविद्यालयाचा आणि गावाचा नावलौकिक वाढवला आहे त्यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल वसंत शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष मा. शेषराव चव्हाण साहेब व संस्थेचे सचिव सुशांत शेषराव चव्हाण साहेब यांच्या हस्ते शेख मन्सूर यांचा शाल व श्रीफळ देऊन गौरव करण्यात आला या सत्कार सोहळा वेळी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. शंकर सकनुरे, कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. राठोड शिवाजी , IQAC समन्वयक प्रा.डॉ.हावा आश्विन , प्रा रॉपनवाड सर ,प्रा.पाटील एस एस प्रा.डॉ.गरुडकर ,प्रा सोनकांबळे प्रा,होनवडजकर प्रा,डॉ.बेटकर मॅडम. प्रा. डॉ आतार मॅडम यांच्यासह अनेक प्राध्यापक उपस्थित होते

तसेच शिक्षकेतर कर्मचारी श्री विशाल चव्हाण श्री सचिन घाटे श्री सचिन चव्हाण श्री शरद पाटील श्री श्रीनिवास राठोड श्री सुभाष राठोड श्री गणेश माळेगावे श्री ईश्वर पाटील श्री स्वप्निल राठोड यांच्यासह संस्थेतील सर्व कर्मचारी शेख मन्सूर यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले महाविद्यालयाच्या वतीने आणि संपूर्ण संस्थेच्या वतीने शेख मन्सूर यांना पुढील स्पर्धेसाठी हार्दिक शुभेच्छा



## डॉ. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानने दिला स्वच्छतेचा संदेश --" स्वच्छतेतून समाजजागृती "

**दैनिक युवक आधार**
**निलेश फुंडे रेवदंडा**

पावसाळ्यातील कचरा हटवून 'स्वच्छ गाव – सुंदर गाव' मोहिमेत 55.85 टन कचऱ्याचे संकलन! डॉ. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानच्या 1335 सदस्यांचा साळाव ते अलिबाग परिसरात सहभाग पावसाळ्यात रस्त्याच्या दुतर्फा वाढणारी झाडे, झुडपे, प्लास्टिक, कचऱ्याचे ढीग आणि पावसाच्या पाण्यामुळे साचणारी घाण यामुळे रस्ते अपघातप्रवण होतात, तसेच परिसरात अस्वच्छतेचे साम्राज्य वाढते. या पार्श्वभूमीवर डॉ. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान तर्फे दरवर्षीप्रमाणे यावर्षीही स्वच्छता अभियान राबविण्यात आले. आजच्या मोहिमेत साळाव ते रेवदंडा, चौल, नागाव, कुरूळ मार्गे अलिबागपर्यंत स्वच्छतेची मोठी मोहीम हाती घेण्यात आली. या उपक्रमात प्रतिष्ठानचे तब्बल 1335 स्वयंसेवक कार्यकर्त्यांनी सहभाग नोंदवला."स्वच्छतेतून काय साध्य झाले ?" रस्त्यालगत वाढलेली झाडे व झुडपे छाटण्यात आली.नाल्यांत साचलेला चिखल, प्लास्टिक व कचरा काढून टाकण्यात आला.रस्त्याच्या कडेला असलेले गवत उपटून परिसर स्वच्छ करण्यात आला.वाहतुकीत अडथळा निर्माण करणारा व अपघाताला कारणीभूत ठरणारा रस्ता मोकळा करण्यात आला.नागरिकांच्या आरोग्यास धोका निर्माण करणारा एकूण 55.85 टन कचरा संकलित करून योग्य पद्धतीने विल्हेवाट लावण्यात आली.या अभियानामुळे रस्त्याचे सौंदर्य तर खुललेच, परंतु स्वच्छतेमुळे डेंग्यू, मलेरिया,



पाण्यातील रोगांचा धोका कमी होईल, सुरक्षित व स्वच्छ वातावरण नागरिकांना लाभेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.*स्वच्छतेचा संदेश* स्वच्छतेच्या या भव्य मोहिमेतून प्रतिष्ठानने पुन्हा एकदा समाजासमोर "स्वच्छ गाव, सुंदर गाव" हा संदेश अधोरेखित केला.

नागरिकांनीही आपल्या आजूबाजूला कचरा टाकू नये, प्लास्टिकचा वापर टाळावा व पर्यावरण रक्षणासाठी पुढे यावे, असे आवाहन यावेळी करण्यात आले.

# डायघर गावासाठी एकवटले ५० गावातील भूमिपुत्र, दिवा प्रभाग समितीला घातला घेराव.

**दैनिक युवक आधार,**
**रमेश राऊत कल्याण ग्रामिण प्रतिनिधी**

डोंबिवली जवळ असलेल्या डायघर गावामध्ये दिनांक१८आणि १९ऑगस्ट रोजी झालेल्या मुसळधार पावसामुळे कमरे इतके पाणी साचून रहिवाशांच्या घरात पाणी घुसून प्रचंड असे नुकसान झाले हे पाणी भरण्याचे कारण म्हणजे शिळफाटा ते कल्याण या रस्त्याच्या रुंदीकरणात येथील असलेले नैसर्गिक नाल्यांची रुंदी कमी करण्यात आली आणि बरेचसे नाले बंदही करण्यात आले आहेत तसेच या परिसरात होत असलेल्या विकास विकासामुळे परिसरात मोठ मोठे टावर उभे राहत आहेत हे बिल्डर सुद्धा भराव करत असताना नाले बुजवत आहेत आणि स्वतःच्या बिल्डिंग मधील ड्रेनेजचे पाणी सुद्धा जाण्यासाठी नाल्यांची व्यवस्था करीत नाहीत त्यामुळे जवळपास पाच वर्षापासून डायघर गावातील नागरिकांना पावसाळ्यात प्रचंड असा त्रास सहन करावा लागतोय.

दिनांक 22 ऑगस्ट रोजी दहा ते बारा आगरी समाजातील संघटनांनी एकत्र येऊन दिवा प्रभाग समितीचे सहाय्यक आयुक्तांची भेट घेऊन लवकरात लवकर डायघर गावात साचणाऱ्या



पाण्याचा विसर्ग कसा होईल याची उपायोजना करावी अन्यथा भूमिपुत्रांचे मोठे जन आंदोलन उभारून दिवा प्रभाग समितीला टाळा ठोकण्याचा इशारा या सर्व संघटनांनी दिला आहे या वेळी महाराष्ट्र राज्य कॉंग्रेस पक्षाचे सचिव श्री. संतोष केणे,माजी नगरसेवक श्री.बाबाजी पाटिल, माजी नगरसेवक श्री.हिरा पाटिल,आगरी समाज प्रबोधन संस्था व आगरी समाज सामुदायिक विवाह सोहळा अध्यक्ष, सचिव श्री. काळु कोमस्कर, २७ गाव सर्व पक्षीय युवा मोर्चाचे प्रमुख संघटक श्री.गजानन पाटील, २७ गाव सर्व पक्षीय संघर्ष समितीचे सर्वेसर्वा श्री. सत्यवान म्हात्रे,उपाध्यक्ष श्री.रतन शेठ पाटिल (सोनारपाडा ),भुमिकन्या व भुमिपुत्र सामाजिक संस्थेचे कार्याध्यक्ष श्री.मधुकर माळी(भोपर गाव),श्री. शिवाजी माळी (भोपर गाव), सामाजिक कार्यकर्ता श्री.नरेश गायकर (काकोले गाव,अंबरनाथ),ह.भ.प.महेश (महाराज) संते (उसारघर गाव),श्री.कर्सन पाटील साहेब (घारिवली गाव),राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे कल्याण ग्रामीण अध्यक्ष) मा.श्री. वासुदेव संते (उसारघर गाव),श्री.सुनील म्हस्कर(दहिसर मोकाशी पाडा ) श्री. बाबुराव मुंडे (खरवलीदेवी),श्री.साहिल पाटील (दिवा ,शिळ मंडळ अध्यक्ष भाजपा,पडले गाव),श्री.रामचंद्र शेठ पाटिल (सोनारपाडा),श्री.संदिप पालकरी (सोनारपाडा),श्री.संतोष पाटील(संदप गाव),श्री.राजेश काळण (आजदे गाव),श्री.बळीराम म्हात्रे (गोळीवली गाव),श्री.दिलीप पाटिल( गोळीवली गाव),श्री.सखाराम पाटिल (मोठी देसाई),श्री.रमेश पाटील (निलजे गाव),श्री.रमेश कराले साहेब( कोन गाव),सौ.नलिनी ताई (दापोडे गाव),(मनसे ) भिवंडी ग्रामीण उपध्यक्ष श्री.चंदू बाबा(सरवली गाव),श्री.विशाल( दादा)मुंडे (आगासन गाव),श्री.विवेक (दादा) म्हात्रे (दातिवली गाव),श्री. यशवंत पाटील साहेब (खिडकाळी गाव),श्री. गोपीनाथ माऊली( देसाई गाव),श्री.राम म्हात्रे (देसाई गाव),श्री.सचिन म्हात्रे( देसाई गाव),कु.विश्वास पाटील (खार्डी गाव), श्री.सतिश म्हात्रे (पडले गाव), कु.पप्पु रोकडे (मोठी देसाई).नेहमीच भुमिपुत्रांच्या मोफत मध्ये बातम्या लावणारे मुलुंड गावातील( पत्रकार सेवक) श्री.सतिश (भाऊ) पाटील,श्री.रमेश राऊत(पत्रकार दैनिक युवक आधार), श्री. गुरुनाथ भोईर पत्रकार(शिळ गाव ) तसेच डायघर गावातील भुमिपुत्र आणि ग्रामस्थ मंडळ उपस्थित होते.

दैनिक युवक आधार हे पत्रक मालक, प्रकाशक भारती संतोष आमले तसेच मुद्रक करणसिंग प्रल्हादसिंग सिरसवाल यांनी सिद्धि प्रिंटर्स, मंगल नगर मलकापूर पिन ४४३१०१ जि बुलढाणा येथे छापून दैनिक युवक आधार मुख्य कार्यालय २०३ इंद्रप्रस्थ रेसिडेन्सी ग्रामपंचायत जवळ मु पो आदई ता. पनवेल जि रायगड ४१०२०६ येथून प्रकाशित केले आहे. संपादक भारती संतोष आमले.

daily YUVAK ADHAR Printed by Karansingh Pralhadsingh Siraswal and published by Bharti Santosh Amle on behalf of Bharti Santosh Amle and printed at Siddhi Printers, MANGAL NAGAR MALKAPUR PIN 443101 DIST- BULDHANA. And Published at Head Office daily YUVAK ADHAR, INRAPRASTH SOCIETY, ? WING FLAT NO. 203-202 SERVE NO 28/1/ 3 PANVEL RAIGAD, ADAI PANVEL DIST- RAIGAD, Editor Bharti Santosh Amle

# विद्यार्थ्यांनी दृढ संकल्प करून उच्च पद प्राप्त करावे व आपल्या आईवडिलांचे स्वप्न साकार करावे- अॅड.डॉ.सत्यपाल कातकर

दैनिक युवक आधार
संजीव भांबोरे

वरोरा (चंद्रपूर)बुध्द धम्म प्रचार समिती शाखा वरोरा द्वारा दिनांक १७ ऑगस्ट २०२५ ला लोकमान्य विद्यालय,सभागृहात धम्म ज्ञान परीक्षा आयोजित करण्यात आली ज्यात १२० विध्यार्थी सहभागी झालेत त्या सर्व विध्यार्थी व पालकांसाठी स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन आयोजित करण्यात आले, सदर कार्यक्रमात शालेय तथा कनिष्ठ महाविद्यालयिन विध्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन करताना मनोवैज्ञानिक, शिक्षणतज्ञ,अड.डॉ.सत्यपाल कातकर, अधिवक्ता,उच्च न्यायालय ह्यांनी समुपदेशन व मार्गदर्शन केले. सदर प्रसंगी मार्गदर्शन करताना कार्यक्रमाचे मुख्य मार्गदर्शक अड.डॉ.सत्यपाल कातकर म्हणाले'



"व्यक्तिगत क्षमता व मानसिक वाढ सकारात्मक दिशेने करण्यासाठी समुपदेशन उत्प्रेरक म्हणून सहाय्य करते तेव्हा प्रशिक्षित मनोवैज्ञानिक समुपदेशकांचे समुपदेशन घेतल्यास विद्यार्थ्यांना त्यांच्या ध्येय्यापर्यंत सहज पोहचता येते तसेच सर्वांना जीवनात मोठे व्हावे असे वाटते परंतु योग्य मार्ग वा समुपदेशन मिळत नसल्यामुळे आपण पाहिजे त्याप्रमाणात यशस्वी होत नाही ह्यांचे कारण इच्छा अमर्याद आहेत आणि स्त्रोत मर्यादित आहेत त्यामुळे आपले मानसिक सामर्थ्य आणि क्षमता वाढविणे अत्यन्त आवश्यक आहे. सनदी अधिकारी वा आयएएस, आयपीएस, आयएफएस आदी महत्वाच्या सेवेमध्ये अधिकारी स्पर्धा परीक्षेद्वारे नियुक्ती करण्यासाठी भारतीय संविधानाचे अनुच्छेद ३१५ व ३२० अनुसार केंद्रासाठी संघ लोकसेवा आयोग व प्रत्येक राज्यासाठी राज्यसेवा आयोग स्थापित करण्याची संविधानिक तरतूद आहे. महाराष्ट्र लोकसेवा आयोग हे भारतीय संविधानाद्वारे स्थापित आयोग होय,राज्यात राजपात्रित अधिकारी वा इतर राज्यसेवा पदाच्या सरळ नियुक्ती स्पर्धा परीक्षा,प्रशासकीय सेवा स्पर्धा, मर्यादित सेवा परीक्षा महाराष्ट्र राज्य आयोग स्पर्धा परीक्षा आयोजित करते त्याचा लाभ आपण घेतला पाहिजे. देशाच्या वर्तमान स्थितीवर वास्तववादी भाष्य करताना डॉ. सत्यपाल कातकर म्हणाले देशात व राज्यात परीक्षावर परीक्षा घेतल्या जात आहेत यात सरकारने प्रत्येक कोर्स साठी कॉमन एंट्रेस टेस्ट सुरु केली व प्रवेश स्पर्धा परीक्षा नावाखाली सामन्याची आर्थिक लूट केल्या जात आहे. इंजिनीरिंगमध्ये महाराष्ट्र राज्यात १८३७६० जागा आहेत तर मेडिकल मध्ये राष्ट्रीय पातळीवर लाखोच्या वर जागा आहेत त्यामुळे कोचिंग क्लासेसची बाजारीकरण सुरु आहे व ह्यासाठी बस स्थानक,प्रिंट आणि मास मीडियावर जाहिरात देऊनच नव्हे तर घरोघरी दहावी पास विद्यार्थ्यांच्या पालकांना आपल्या खाजगी शिकवणी वर्गाकडे वळवण्यासाठी फोन द्वारे वार्तालाप करून लाखो विद्यार्थ्यांना आपल्या खाजगी वर्गाकडे आकर्षित करून प्रवेश परीक्षा नीट,जेईई, सीईटी नावाखाली सामान्यांचे श्रमाने कमविलेल्या पैश्याचे आर्थिक शोषण केल्या जात आहे.अशा स्पर्धेच्या जगात टिकायचे असेल वा नौकरी हमखास प्राप्त करायचे असेल तर विद्यार्थ्यांनी कॉस्ट मॅनेजमेन्ट अकाऊंटन्ट सीएमए/ सीए/ सीएस कोर्सकडे बारावी नंतर वळावे व कमी वेळेत, कमी पैशात अधिकारी बनण्यासाठी या कोर्सला प्रवेश घ्यावा तसेच विद्यार्थ्यांनी दृढ संकल्प करून चांगल्या मित्र वा संमुपदेशकांचे समुपदेशन घेऊन उच्च पद प्राप्त करून आपल्या आईवडीलांचे स्वप्न साकार करावे. त्याही पुढे ते म्हणाले डॉ. बाबासाहेब आंबेकरांच्या मते पालक आपल्या मुलाच्या जन्माचे साथी आहेत कर्माचे नव्हे या संकल्पनेचा आपण त्याग केला पाहिजे.पालक मनी आणतील तर ते आपल्या मुलांचे भवितव्य साकारू शकतात,सोबतच मुलांच्या शिक्षणाबरोबर आपल्या मुलींच्या शिक्षणाचाही गंभीरतेने विचार करून त्यांना उच्च शिक्षण द्यावे असे मार्मिक मार्गदर्शन केले.ह्याप्रसंगी बाळू जिवणे सर ह्यांनीही मार्गदर्शन केले,कार्यक्रमाचे अध्यक्ष भाऊराव निरंजने,प्रचार प्रमुख,बुद्ध धम्म प्रचार समिती वरोरा हे होते तर प्रमुख अतिथी म्हूणन भाऊराव चिवंडे,माजी गटशिक्षणाधिकारी, रतनजी भोसले, ऋषिजी वाघमारे, अध्यक्ष,समाज क्रांती आघाडी,तालुका राजुरा, डॉ.धनराज वानखेडे,शिंदोला,वणी आणि विजय उपरे,माजी संचालक, कृषी उत्पन्न बाजार समितीचे,राजुरा हे अतिथी म्हणून उपस्थित होते तर सुत्रसंचालन अमर पिपरे ह्यांनी केले.कार्यक्रम यशस्वीकरीता आयुष्यमती स्नेहा ठोंबरे,अनुसया पेठकर, मंगला डांगरे,विना लोनबळे व हनुमान येसांबरे, देवराव नगराळे आदिनी मोलाचे सहकार्य केले,सदर कार्यक्रमास बहुसंख्येने विद्यार्थी उपस्थित होऊन मार्गदर्शनाचा लाभ घेतला..

## लोकनेते रामशेठ ठाकूर यांचा समाजसेवा आदर्श समाजातील सर्वांसाठी महत्त्वपूर्ण - रयत शिक्षण संस्था चेअरमन चंद्रकांत दळवी

### छत्रपती शिवाजी कॉलेज सातारामध्ये साकारली 'रामशेठ ठाकूर अभ्यासिका'

### मुलांच्या वस्तीगृहासाठी लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्याकडून ५० लाखाची देणगी जाहीर

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (प्रतिनिधी)**

रयत शिक्षण संस्थेचे थोर देणगीदार लोकनेते रामशेठ ठाकूर हे समाजातील अत्युच्च आणि महान व्यक्तिमत्व असून त्यांनी केलेल्या समाजसेवा कार्याचा आदर्श समाजातील सर्वांसाठी महत्त्वपूर्ण आहे, अशा गौरवोद्गारांतून रयत शिक्षण संस्थेचे चेअरमन आदरणीय चंद्रकांत दळवी यांनी लोकनेते रामशेठ ठाकूर यांचा सातारा येथे सन्मान केला.

रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिलचे सदस्य, माजी खासदार थोर देणगीदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या देणगीतून सातारा येथील छत्रपती शिवाजी कॉलेज येथे साकारण्यात आलेल्या 'रामशेठ ठाकूर अभ्यासिका' आणि सौ.मिनल व श्री अमोल उनउणे यांच्या देणगीतून साकार झालेल्या प्राचार्य शंकरराव उर्फ बापूसाहेब ऊनउणे स्मृती दालन व मराठी भाषा प्रयोगशाळेचा लोकार्पण सोहळा रयत शिक्षण संस्थेचे चेअरमन चंद्रकांत दळवी यांच्या हस्ते समारंभपूर्वक झाले.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून रयत शिक्षण



संस्थेचे व्हाईस चेअरमन अॅड.भगीरथ शिंदे, मॅनेजिंग कौन्सिल सन्माननीय सदस्य लोकनेते रामशेठ ठाकूर, सचिव विकास देशमुख, जे के बापू जाधव, कर्मवीर भाऊराव पाटील विद्यापीठाचे कुलगुरू प्रि. डॉ. ज्ञानदेव म्हस्के, जनरल बॉडी सदस्य वाय. टी. देशमुख यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते.

यावेळी आदरणीय लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी छत्रपती शिवाजी कॉलेजमधील मुलांच्या वसतिगृहासाठी तब्बल ५० लाख रुपयांची देणगी जाहीर केली. विद्यार्थ्यांसाठी ही देणगी मोठा दिलासा ठरणार असून यामुळे उच्च दर्जाच्या राहण्याच्या सुविधा व समृद्ध शैक्षणिक वातावरण उपलब्ध होणार आहे. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी योग्य व सकारात्मक वातावरण निर्माण होईल. त्यामुळे ग्रामीण व उपनगरातील विद्यार्थ्यांना मोठा फायदा होईल आणि त्यांच्या उज्ज्वल भविष्यास हातभार लागणार आहे. समाजातील सर्व स्तरांतील विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण व सुविधा उपलब्ध करून देण्याच्या या कार्यातून सामाजिक बांधिलकीचे उत्तम उदाहरण प्रस्थापित झाले आहे.त्याप्रती कॉलेज प्रशासनाने लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या या उदार देणगीबद्दल कृतज्ञता व्यक्त केली आहे.

या कार्यक्रमात ऍड. भगीरथ शिंदे, डॉ. ज्ञानदेव मस्के प्रा. डी. ए. माने, मीनल उनउणे, यांनी मनोगते व्यक्त केले. छत्रपती शिवाजी कॉलेज सातारा चे प्राचार्य डॉ. राजेंद्र मोरे यांनी उपस्थितांचे स्वागत व कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. डॉ. आबासाहेब उमाप यांनी आभार मानले डॉ. विद्या नावडकर यांनी सूत्रसंचालन केले. कार्यक्रमाला रयत शिक्षण संस्थेचे पदाधिकारी, हितचिंतक तसेच छत्रपती शिवाजी कॉलेजचे आजी-माजी विद्यार्थी, शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

## नील हॉस्पिटल येथे रक्तदान शिबिर संपन्न

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**

२२ ऑगस्ट २०२५ रोजी नील हॉस्पिटल सेक्टर १, न्यू पनवेल येथे एमजीएम हॉस्पिटल ब्लड सेंटर कामोठे नवी मुंबई यांच्या सहकार्याने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. बीके डॉ शुभदा नील प्रसिद्ध स्त्रीरोग कॅन्सर व गर्भ संस्कार तज्ञ यांनी राष्ट्रीय रक्तदान - महादान शिबिराच्या प्रयोजनाबद्दल व आरोग्या विषयी मोलाचे मार्गदर्शन केले. बी के तारा दिदी ब्रह्माकुमारीज पनवेल च्या संचालिका यांनी सर्वांना आशीर्वाचन दिले.



बी के तारा दिदी, बी के डॉ शुभदा नील, डॉ कविता चोतमोल माजी महापौर, राजश्री वावेकर माजी नगरसेविका, मंगला गडमुळे राष्ट्रपती पुस्कार प्राप्त आदर्श शिक्षिका, डॉ पी बी नील डायरेक्टर नील हॉस्पिटल, डॉ नीलेश बांठिया डायरेक्ट निओ क्लिनिक पनवेल, डॉ पुष्कर लिखिते, डॉ जोसेफ लझार, डॉ वैष्णवी, राजेश आत्तारडे एमजीएम हॉस्पिटल ब्लड सेंटर कामोठे, डॉ स्वाती लिखिते असिस्टंट गव्हर्नर रोटरी, महेंद्र सुराणा अध्यक्ष रोटरी क्लब पनवेल एलिट, रितेश मुनोत माजी अध्यक्ष रोटरी क्लब पनवेल एलिट, डॉ. रविकिरण अध्यक्ष रोटरी क्लब खारघर मिडटाउन, डॉ. कोमल गुंडेवार अध्यक्ष रोटरी क्लब खारघर मिडटाउन 2026, प्रेमेंद्र बहिरा अध्यक्ष लायन्स क्लब सरगम, अंजली परदेशी अध्यक्ष इनरव्हिल क्लब न्यु पनवेल, अड मनोहर सचदेव अध्यक्ष झूलेलाल ट्रस्ट, हरिश शहा अध्यक्ष जायंटस क्लब व इतर मान्यवर यांच्या द्वारे रक्तदान शिबिराचे उद्घाटन करण्यात आले.

डॉ पी बी नील डायरेक्टर नील हॉस्पिटल, डॉ नीलेश बांठिया डायरेक्ट निओ क्लिनिक पनवेल, डॉ जोसेफ लझार, प्रेमेंद्र बहिरा अध्यक्ष लायन्स क्लब सरगम, फार्मा मॅनेजर निकेतन, उलकेश, बी के भगवान, सिस्टर अंजली व अन्य रक्तदात्यांनी या वेळी रक्तदान केले. सर्व रक्तदात्यांचा ईश्वरीय भेट, प्रसाद, प्रमाणपत्र देऊन सन्मान करण्यात आला. या वेळी रक्तदात्यांची हिमोग्लोबिन, रक्तदाब, वजन, मधुमेह तपासणी (ब्लड शुगर RBS), हृदय तपासणी (ECG ईसीजी) ही तपासणी मोफत करण्यात आली. लायन्स क्लब, रोटरी क्लब, इनरव्हील क्लब, नील हॉस्पिटल न्यू पनवेल, निओ क्लिनिक पनवेल, झूलेलाल ट्रस्ट, जायंटस क्लब आणि इतर सेवाभावी संस्थानी हे रक्तदान शिबिर यशस्वी होण्या साठी सहकार्य केले.

## मराठी भाषेला ' अभिजात ' दर्जा सुवर्णक्षण ....

**दैनिक युवक आधार**
**जिल्हा प्रतिनिधी प्रमुख/एम.डी.भोईर**

मराठीमुळे देशाची सांस्कृतिक विविधता अधिक समृद्ध झाली आहे. त्यामुळे या भाषेचा 'अभिजात ' भाषा म्हणून करण्यात आलेला सन्मान हा संपूर्ण देशाने छत्रपती शिवाजी ३५० व्या वर्षा निमित्य केलेला मानाचा मुजरा आहे. ३ ऑक्टोबर २०२४ हा दिवस मराठीसाठी सुवर्णक्षण आहे.

जातिवंत अभिजाततेच्या बळावर शेकडो वर्षाची वैभवशाली भाषिक परंपरा निर्माण करणाऱ्या मायमराठीला अखेर ती ' अभिजात 'असल्याची मान्यता मिळाली. गेली अनेक वर्षे सुरु असलेले अनेकांचे अथक प्रयत्न मार्गी लागले आणि तामिळ, संस्कृत, कन्नड, मलयालम आणि उडीया यांच्या प्रमाणे मराठी ही आत्ता अधिकृतपणे " अभिजात " भारतीय भाषा झाली. याभाषेचा इतिहास, तिची लिपी, तिचे व्याकरण त्या भाषेत निर्माण झालेले विविध प्रकारचे साहित्य, म्हणी, वाक्प्रचार, अलंकार विविध बोलींमधून प्रकट होणारी भाषेची लडीवाल आणि जिवंत रूपे, इतर भारतीय भाषांमध्ये आभावानेच असलेले मराठी कोष वागन्मय भाषभिमानामुळे निर्माण होणारे वेगवेगळे भाषिक वाद..... हे सगळे लेणे लेवून मराठी भाषेचा प्रवाह ' अभिजात ' नसतानाही गेली कित्येक शतके अखंड वाहतो आहे. कैक राजवटी आल्या आणि गेल्या समाज बदलला, जगणे बदलले त्याप्रमाणे मराठी ही बदलत गेली. अनेक बदल आत्मसात करत, काळानुरूप नको टाकून देत तिने सातत्याने नवे रुपडे धारण केले. जसं जसे जागतिकरण होत आहे तसे तसे केवळ मराठीतच नव्हे तर जगातील सर्व स्थानिक भाषांचे किव्हा मराठी मातृभाषेचे ध्रुवीकरण होत आहे भाषा जरी संपर्काचे माध्यम असली तरी जागतिकी क रणाच्या प्रक्रियेत स्थानिक किंवा मातृभाषा आभावानेच वापरल्या जातात परंतु आपण आपल्या भाषेच्या बाबतीत बोलण्या पासुन लिहिण्यापर्यंत ठाम असू तरच आपल्या भाषेचा प्रसार आणि प्रचार होईल. जर आपणच आपल्या भाषेत बोललो नाही अथवा ती वापरली नाही मग इतर भाषिय का बरे आपल्या मराठी भाषेविषय आस्था दाखवतील. हें साधे सरळ गणित आहे. आपल्याला मराठी भाषेची पताका भारतात / जगात फडकवायची असेल तर आपण सर्व व्यवहार मराठीतच करायला नको का? ज्या मराठी भाषेला दोन हजार पाचशे वर्षाचा इतिहास आहे. नवव्या शतकापासून मराठीचा वापर आहे. देवांची भाषा संस्कृत पासुन प्राकृत महाराष्ट्री बोलीपासून सुरुवात झाली पैठण मधील सातवाहन सम्राज्याने मराठीचा प्रशासनात वापर केला आहे. मग आशा समृद्ध मराठी भाषेबद्धल असलेला ' न्यून ' सोडून देऊन खुल्या दिलाने मराठीचा जळी स्थळी वापर करावयास नको का? उगाच मराठी संवर्धन करा म्हणून आक्रो्श करण्यात काय उपयोग..

***मनोहर जामकर -***
***सुलेखनकार. उरण.***

## शिवसेना ग्राहक संरक्षण कक्ष घाटकोपर पश्चिम विधानसभातर्फे आरती संग्रह पुस्तकाचे प्रकाशन

**दैनिक युवक आधार**
**मुंबई (शांताराम गुडेकर)**

शिवसेना ग्राहक संरक्षण कक्ष घाटकोपर पश्चिम विधानसभा शिवसेना पक्षप्रमुख मा.श्री. उद्धव ठाकरे साहेब यांच्या आदेशानुसार तसेच शिवसेना नेते सचिव शिवसेना ग्राहक संरक्षण कक्षाचे अध्यक्ष खासदार श्री.अनिल भाऊ देसाई यांच्या मार्गदर्शनाखाली ईशान्य मुंबई विभाग क्र.८ विभाग प्रमुख श्री.सुरेशजी पाटील तसेच ग्राहक संरक्षण कक्ष सचिव श्री.निखिलजी





सावंत व अशोकजी शेंडे या सर्वांचा हस्ते आरती संग्रह पुस्तक याचे प्रकाशन करण्यात आले. तसेच कक्ष विधानसभा संघटक श्री. यशवंत खोपकर यांच्या प्रयत्नातून आरती संग्रह पुस्तक छापण्यात आले असून या उपक्रमचे सर्वांनी कौतुक केले.यावेळी यशवंत खोपकर ,कक्ष कार्यालय चिटणीस विश्वनाथ जाधव,कक्ष प्रसारक अनंत पवार, उपसंघटक राजेंद्र पेडणेकर, कक्ष वार्ड १२३ संघटक संतोष चादे,कक्ष वार्ड संघटक १२४ निर्मला आवटे, कक्ष वार्ड संघटक १२६ तानाजी उलालकर,इत्यादी पदाधिकारी आरती संग्रह प्रकाशन कार्यक्रमला उपस्थित होते.

## चिखपहेला येथे तान्हा पोळा उत्साहात साजरा

**दैनिक युवक आधार**
**संजीव भांबोरे**

**भंडारा-** तालुक्यातील पहेला येथून 2 किलोमीटर अंतरावर असलेल्या मौजा चिखलपहेला येथे तान्हा पोळा उत्साहात साजरा करण्यात आला. पूर्व विदर्भात नागपूरसह गेल्या कित्येक वर्षापासून तान्हापोळा साजरा करतात. अनेक पालक आपल्या मुलांना वेगवेगळ्या पोशाखामध्ये, लाकडी नंदीबैल सजवून आणतात. तो परिसर तोरण, पताका, फुगे, लावून सजवितात. त्याचप्रमाणे त्या ठिकाणी महादेवाची गाणी म्हटले जाते. मुलांना शेतीत राबणाऱ्या बैलांचे महत्त्व कळावे त्याचप्रमाणे शेतीचे महत्व कळावे व लहान मुलांचे आनंद द्विगुणित करण्याकरता दरवर्षी बैल पोळ्याच्या दुसऱ्या दिवशी तान्हा पोळा गावातच मंदिराच्या किंवा सार्वजनिक ठिकाणी हा भरविला जातो .लहान मुले ,मुली,नवीन कपडे घालून व लाकडी नंदीबैल सजवून त्या ठिकाणी येत असतात. त्यानंतर



उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सर्व नंदीबैलांचे पूजन केले जाते. त्यानंतर नंदीबैलाचे परीक्षण करून उत्तम सजावट केलेल्या नंदी बैलांना बक्षीस दिले जाते. त्यात प्रामुख्याने प्रथम- भार्गवी अंकुश नरुले,द्वितीय -अधिरा विकास रोहनकर,, तृतीय- शोषिन मिथुन गजभिये ,चतुर्थ -युक्ती अमरदीप लोणारे, पाचवा -माही भारत शहारे ,सहावा- मंथन मार्तंड शहारे ,सातवा -विहांस रोशन चचाने यांना दामोदर शहारे ,मनीषा चापले ,मुरलीधर शहारे, दिलीप शहारे ,नितेश शहारे, सरिता नरूले ,श्रीधर शहारे, मार्तंड शहारे ,यांच्या प्रमुख उपस्थितीत बक्षीस वितरण विजेत्यांना करण्यात आले ..त्याचप्रमाणे उपस्थित सर्व मुला मुलींना खाऊ, पेन ,पुस्तक ते वाटप केल्या गेले . त्यानंतर मुले मुली संबंधितांच्या घरी जाऊन मिळेल ते दान स्वीकारत असतात. अशाप्रकारे तान्हा पोळा उत्सव साजरा केल्या जातो. यावेळी गावातील सर्व महिला भगिनी नागरिक मोठ्या संख्येने एकत्रित येत असतात.

## तोल जाऊन अंबा नदीत पडलेला अन्वर पिंजारी गेला वाहून ; शोध मोहीम जोरात चालू पण यश नाही

**दैनिक युवक आधार**
**नागोठणे वार्ताहर**

नागोठणे : येथील मोहल्ला येथील रहिवासी वाहन चालक असलेला अन्वर अजीज पिंजरी वय 55 वर्षे हा शनिवार 23 ऑगस्ट रोजी सकाळच्या सुमारास ऐतिहासिक नागोठणे – वरवठणे पूलावरून जात असता तोल जाऊन पाण्यात पडला व वाहून गेला असून त्याच्या शोधकार्य मोहीम जोरात चालू आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार,नागोठणे मोहल्ला येथील रहिवासी व वाहन चालक अन्वर अजीज पिंजारी हा शनिवारी सकाळी 10.30 वाजण्याच्या सुमारास ऐतिहासिक नागोठणे – वरवठणे पूलावरून चालत जात असताना त्याचा तोल जाऊन पाण्यात पडला. त्यानंतर त्यांनी पाण्यात पूलाच्या कठड्याचा आधार घेतला.याची माहिती पोलिस व ग्रामस्थ यांना मिळताच ते



घटनास्थळी दाखल झाले व त्यांनी त्याला दोर टाकून वाचविण्याचा प्रयत्न केला परंतु दोर हातातून सुटल्याने अनावर हा वाहत्या पाण्यात वाहून जात असताना पोलिस शिपाई प्रकाश हंबीर यांनी त्याला वाचविण्यासाठी पाण्यात उडी घेतली पण पाण्याच्या जास्त प्रवाहामुळे ते अन्वरला वाचवू शकले नाही. पोलिस व ग्रामस्थांनी बराच वेळ शोधा शोध करूनही नदीला जास्त पाणी असल्याने तो कुठेही सापडला नाही. त्यानंतर आलेल्या एस.व्ही.आर.एस.एस रेस्क्यू टिमने सायंकाळी 5.00 वाजे पर्यंत शोधण्याचा प्रयत्न केला परंतु त्यांना त्यात यश न आल्याने सदरील मोहीम सायंकाळ झाल्याने थांबविण्यात आली आहे. घटनेचा तपास सहा.पो.नि.सचिन कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली ए.एस.आय. रमेश सोनकर करीत आहेत.

# राज्याच्या प्रत्येक तालुक्यातील 10 गावे स्मार्ट व इंटेलिजंट करणार - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## मुख्यमंत्र्यांच्या हस्ते प्रायोगिक तत्वावर देशातील पहिल्या स्मार्ट व इंटेलिजंट सातनवरी गावाचा शुभारंभ

**दैनिक युवक आधार**
**राकेश यादव प्रतिनिधी**
**वाडी नागपूर नागपूर प्रतिनिधी**

*नागपूर, दि. 24 :* आत्मनिर्भर भारताच्या दिशेने पुढे जात आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी उपयोग करून शेती, आरोग्य, शिक्षण आदी महत्वाच्या सुविधा सातनवरी गावात उपलब्ध करून देत समृद्ध गावाचे रोल मॉडेल उभे राहिले असून लवकरच राज्याच्या प्रत्येक तालुक्यातील 10 गावे स्मार्ट व इंटेलिजंट करण्याचा कार्यक्रम हाती घेण्यात येणार आहे. याद्वारे पहिल्या टप्प्यात राज्यातील जवळपास 3 हजार 500 गावे स्मार्ट व इंटेलिजंट करणार असल्याचे प्रतिपादन, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज येथे केले. केंद्रीय दूरसंचार मंत्रालयांतर्गत कार्यरत व्हाईस ऑफ इंडियन कम्युनिकेशन टेक्नॉलॉजी एंटरप्रायजेसने (व्हाईस) देशांतर्गत 24 कंपन्यांच्या संघटनांसोबत एकत्र येत राज्य शासन व नागपूर जिल्हा प्रशासनाच्या मदतीने सातनवरी गावात आधुनिक तंत्रज्ञान आधारित सेवा उपलब्ध करून देत या गावाला देशातील पहिले स्मार्ट व इंटेलिजंट गाव बनविले आहे. प्रायोगिक तत्वावर उभारण्यात आलेल्या या स्मार्ट व इंटेलिजंट गावाचा शुभारंभ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते झाला. त्यावेळी ते बोलत होते. महसूल मंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, खासदार श्यामकुमार बर्वे, आमदार चरणसिंह ठाकूर, सातनवरी गावाच्या सरपंच वैशाली चौधरी, जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विनायक महामुनी आदी यावेळी उपस्थित होते. तंत्रज्ञानाचा प्रभावी उपयोग करून गावात सर्व सुविधा एकाच ठिकाणी उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने सातनवरी गावात सुरू झालेला देशातील स्मार्ट व इंटेलिजंट गावाचा शुभारंभ हे एक क्रांतीकारक पाऊल असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यावेळी आपल्या संबोधनात म्हणाले. गावांना सक्षम करण्याच्या दिशेने प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या दूरदृष्टीतून देशातील गावागावांमध्ये भारतनेट प्रकल्प राबविला गेला. या प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्याचे यशस्वी अंमलबजावणी राज्यात झाली व दुसऱ्या टप्प्याची सुरुवातही झाली. याच धरतीवर महाराष्ट्रात महानेट हा प्रकल्प राबविण्यात आला. आता याच प्रवासात भारतीय तंत्रज्ञान कंपन्यांच्या माध्यमातून आत्मनिर्भर








भारताच्या दिशेने महत्वाचे पाऊल टाकत गावांमध्ये आरोग्य, शिक्षणासोबतच स्मार्ट सिंचन, ड्रोनद्वारे किटकनाशके व खत फवारणी, बँक ऑन व्हिल, स्मार्ट टेहळणी अशा एकूण 18 सेवा कमी वेळात उपलब्ध करून देत सातनवरी हे देशातील पहिले स्मार्ट व इंटेलिजंट गाव ठरले आहे. या गावातील शेतकरी ड्रोन व सेंसर आदींचा उपयोग करून माती परिक्षण, फवारणी, खते आदींचे योग्य नियोजन करून शेतीचा उत्पादन खर्च कमी करून उत्पन्न वाढवू शकतील. गावातील पिण्याच्या पाण्याची गुणवत्ता सुधारल्याने गावकऱ्यांचे आरोग्य सुधारेल. टेलिमेडिसिन आदींचा उपयोग होवून गावातच आरोग्य विषयक सुविधा उपलब्ध होणार आहे. गावात प्राथमिक शिक्षणात कृत्रिम बुद्धीमत्ता व स्मार्ट शिक्षणाचा उपयोग होवून वैश्विक ज्ञान विद्यार्थ्यांना मिळेल व सातनवरी गाव लवकरच देशात एक रोल मॉडेल म्हणून नावारूपाला येईल, असे मुख्यमंत्री श्री फडणवीस म्हणाले. तसेच या सेवांचा योग्य प्रकारे वापर करत येत्या वर्षात सातनवरी गावाने देशातील सर्वात प्रगतीशील गाव म्हणून नावलौकीक मिळवावे, अशा अपेक्षाही त्यांनी व्यक्त केल्या. सातनवरी गावाने अल्पावधीतच स्मार्ट व इंटेलिजंट गाव बनण्याचा बहूमान मिळवला असून लवकरच राज्य शासनाच्या वतीने प्रत्येक तालुक्यात 10 गावे स्मार्ट व इंटेलिजंट करण्यात येणार आहे. या प्रकल्पांतर्गत पहिल्या टप्प्यात राज्यातील जवळपास 3 हजार 500 गावे स्मार्ट व इंटेलिजंट करण्यात येईल, असेही त्यांनी सांगितले. महसूल मंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी स्मार्ट सिटी, डिजिटल इंडिया आदी महत्वाचे प्रकल्प देशात राबविले. यालाच पुढे घेवून जात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यात स्मार्ट व इंटेलिजंट गाव तयार करण्याचा महत्वाकांक्षी निर्णय घेतला व नागपूर जिल्ह्याला हा मान मिळाला ही अभिमानाची बाब आहे. मुख्यमंत्र्यांच्या पुढाकाराने नागपूर जिल्ह्याच्या विकासासाठी जिल्हा नियोजनमधून 1200 कोटींचा भरीव निधी मंजूर केला व यामाध्यमातून जिल्ह्यात विविध विकास कामे सुरु असून सातनवरी गावाच्या माध्यमातून देशात विकसित ग्रामीण भागासाठी डिजिटल गावाची सुरूवात झाल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले. खासदार श्यामकुमार बर्वे, आमदार चरणसिंह ठाकूर यांनीही उपस्थितांना संबोधित केले. मुख्यकार्यकारी अधिकारी विनायक महामुनी यांनी प्रास्ताविक केले तर दिनेश मासोदकर यांनी सुत्रसंचलन केले. तत्पूर्वी व्हाईस कंपनीचे प्रमुख राकेश कुमार भटनागर यांनी ग्रामपंचायत कार्यालयात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या समोर स्मार्ट व इंटेलिजंट गाव उपक्रमांतर्गत सातनवरी गावात उपलब्ध करून देण्यात येत असलेल्या विविध सोई सुविधांबाबत माहिती देत सादरीकरण केले. जिल्हा परिषद नागपूरच्या वतीने बांधण्यात येत असलेल्या 40 अंगणवाड्यांचे ई-भूमिपूजन व 15 व्या वित्त आयोगातून प्राथमिक आरोग्य वर्धनी उपकेंद्रात बसविलेल्या सौर पॅनलचे ऑनलाईन लोकार्पण मुख्यमंत्र्यांचे हस्ते यावेळी करण्यात आले. व्हॉईस कंपनी सोबत स्मार्ट व इंटेलिजंट सातनवरी गाव घडविण्यात सहभागी कंपन्यांच्या प्रतिनिधींना मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांच्या हस्ते प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले.

## प्रियदर्शनी प्राथमिक शाळेचा शिक्षक विद्यार्थ्यांच्या दारी अभियानाचा शुभारंभ...

**दैनिक युवक आधार**
**पाटोदा (प्रतिनिधी)-**

पाटोदा शहरात असणाऱ्या प्रियदर्शनी प्राथमिक शाळेत संस्थेचे सचिव माननीय डॉ.योगेश भैय्या क्षीरसागर व डॉ. सारिकाताई क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली व मुख्याध्यापक मोरे सर यांच्या नियोजनातून विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी शिक्षक विद्यार्थ्यांच्या दारी अभियानाच्या प्रपत्राचे उद्घाटन व सुरुवात आज पाटोदा शहराच्या माजी सरपंच सौ. कुसुमताई परमेश्वर अडागळे यांच्या शुभ हस्ते करण्यात आली. या वेळी अभियानाच्या उद्घाटक सौ. अडागळे ताई यांचा सत्कार श्रीमती शेलार मॅडम यांनी केला. तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती वीर मॅडम यांनी केले. या अभियानाबाबत माहिती विशद करताना श्री.मोरे सर यांनी सांगितले की शिक्षक विद्यार्थ्यांच्या दारी या अभियानामध्ये शाळेतील शिक्षक विद्यार्थ्यांच्या घरी जाऊन त्यांच्या अभ्यासाबाबतच्या प्रगतीची माहिती तथा पालकांच्या विद्यार्थ्यांच्या अडीअडचणी समजून घेऊन त्यांना मार्गदर्शन करणार आहेत. स्पर्धा परीक्षा वर्तमानपत्र वाचन, पुस्तक वाचन, गृहपाठ, दिक्षा अप, या बाबतही या वेळी मार्गदर्शन करण्यात येणार आहे. या वेळी श्रीमती गायके मॅडम यांची उपस्थिती होती. शेवटी कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन श्री.माताडे सर केले. कार्यक्रमाचा समारोप पसायदान म्हणून करण्यात आला.



## जालना जिल्ह्यातील विविध विकासा संदर्भात विठ्ठलदादा बरकुले यांनी घेतली अजित दादांची भेट...

**दैनिक युवक आधार**
**जालना (अशोक ठोके)**

राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा राज्याचे उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांच्यासोबत जालना जिल्हा संघटक विठ्ठलदादा बरकुले यांनी चर्चा केली.त्यांनी विविध कामांच्या मागण्या संदर्भात चर्चा केली व त्यांनी उपविभागीय बांधकाम विभाग कार्यालय परतूर येथे देण्यात यावे व अपंगांसाठी प्रत्येक कार्यालयात स्वतंत्र ऑफिस असावे व राष्ट्रवादीचे जुने शिलेदार म्हणजेच माजी तालुकाध्यक्ष, सोसायटी चेअरमन, सरपंच, उपसरपंच, माजी सदस्य ग्रामपंचायत, मार्केट कमिटीचे संचालक, पंचायत समिती सदस्य, जिल्हा परिषद सदस्य यांच्यावर कुठल्याही प्रकारचा अन्याय होऊ देणार नाही असे मत दादांनी व्यक्त केले सोबत गर्जे यांच्या समोर दादांनी कार्यालयात सूचना देऊन सांगितले परतूर मंठा विधानसभेतून जास्तीत जास्त जिल्हा परिषद पंचायत समिती सदस्य निवडून येतील असा प्रयत्न करा असे मत दादांनी व्यक्त केले.या वेळी सामाजिक न्याय विभागाचे जालना जिल्हा उपाध्यक्ष सदाभाऊ शिरसाट हे देखील उपस्थित होते.



## वावंजेमध्ये दंगा काबू योजना रंगीत तालीम



**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**

: आगामी गणेशोत्सव, ईद-ए-मिलाद व संभाव्य मराठा आरक्षण आंदोलन अनुषंगाने पनवेल तालुका पोलीस ठाणे हद्दीत 22 ऑगस्ट रोजी वावंजे गाव या ठिकाणी दंगा काबू योजनेची रंगीत तालीम घेण्यात आली.

सदर दंगा काबू योजनेत पनवेल तालुका पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक गजानन घाडगे यांच्यासह 5 सपोनि/पोउपनि, 16 अंमलदार, बीट मार्शल 3 वरील 2 अंमलदार, झोन 3 स्ट्राइकिंगसह 9 अंमलदार, अग्निशामक वाहनसह 1 अधिकारी 4 अंमलदार, प्रा.आ केंद्र वावंजे कडील 1 अम्बुलन्स स्टाफसह हजर होते. दंगा काबू योजना संपल्यानंतर वावंजे गाव मंदिर/मशीद परिसर, चौक या ठिकाणी रूट मार्च करण्यात आला.



**पाटोदा :-** मुसा भाई यांचे हॉटेल आर.के. च्या शुभारंभ प्रसंगी उपस्थित राहुन मुसा भाई व रईस बिल्डर यांना शुभेच्छा देताना. आमदार सुरेश आण्णा धस यांचे स्विय सहाय्यक तथा पाटोदा तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष सोमिनाथ कोल्हे, शेख महेशर, संजय शेवाळे.


**(छाया-दैनिक युवक आधार पाटोदा.)**

## निमगावचोभात सोन्या- चांदीचा 60 हजाराचा ऐवज लांबविला

### चोरटे शेतकऱ्यांना लक्ष करताना दिसत आहे

**दैनिक युवक आधार**
**बीड आष्टी प्रतिनिधी :मारुती सत्रे**

तालुक्यातील निमगावचोभा परिसरातील गिऱ्हे वस्तीवर अज्ञात चार चोरट्यांनी घरातील व्यक्तींना मारहाण करून सोन्या- चांदीच्या दागिन्यांसह साठ हजाराचा ऐवज लुटून चोरट्यांनी पलायन केल्याची घटना शुक्रवार दि. 22 रोजी पहाटेच्या सुमारास घडली. पोलीस सूत्रांकडून देण्यात आलेली अधिक माहिती अशी की, आष्टी तालुक्यातील निमगावचोभा येथे गिऱ्हे वस्तीवर शुक्रवारी पहाटे तीन वाजेच्या सुमारास सतीश नवनाथ गिऱ्हे यांच्या घराचा कडीकोंडा उघडून अज्ञात चार चोरट्यांनी घरातील व्यक्तींना मारहाण करीत चार ग्रॅम सोन्याचे मंगळसूत्र, साडेतीन ग्रॅमचे डोरले व चांदीचे पैंजण असा एकूण पन्नास ते साठ हजाराचा ऐवज लुटून चोरट्यांनी पलायन केल्याची घटना घडली. घरफोडी झाल्याची माहिती मिळताच सपोनि विजय नरवडे, पोकॉ भाऊसाहेब आहेर, नंदकिशोर सवाशे, अमोल नवले, सरकारी वाहनचालक प्रताप घोडके यांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. मात्र तोपर्यंत चोरट्यांनी पलायन केले होते. याबाबत अज्ञात चोरट्याविरुद्ध आष्टी पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनि



नरवडे करीत आहेत. घटनास्थळी बीडच्या श्वान पथकासह अंगुली निर्देश तज्ञांना पाचारण करण्यात आले होते.

सध्या चोरट्यांनी शेतातील वस्त्यांना लक्ष केले असून, हे चोरटे घरातील सामान उचकण्याऐवजी महिलांच्या अंगावरील दागिने ओरबडतात. घरात महिलांच्या अंगावर तोळाभर का होईना सोने असतेच, सध्या सोन्याला लाखाचा भाव झाला. त्यामुळे चोरटे शेतवत्यांना लक्ष करताना दिसत आहेत.

## कोकणवासीयांना गणपतीसाठी कोकणात जाण्यासाठी भाजपाच्या वतीने मोफत बस

**दैनिक युवक आधार**
**मुंबई प्रविणभाऊ पवार**

भाजप मुंबई अध्यक्ष व महाराष्ट्र शासनाचे पालकमंत्री नामदार ॲड आशिष शेलार यांच्या माध्यमातून रत्नागिरी, देवगड, मालवण, सावंतवाडी कोकणवासीयांची रहिवासी यांना कोकणात जाण्यासाठी मोफत बस योजनेअंतर्गत जिल्हा उपाध्यक्ष एड राजेश दाभोळकर, जिल्हा महिला मोर्चा विवेका दाभोळकर यांच्या वतीने अनिल राजन आयकर व मारुती चौगुले बस प्रमुख यांच्या सहकार्याने दि २३ ऑगस्ट २०२५ रोजी सायंकाळी ७.०० वाजता २ बसेस इंदिरा नगर पोलीस स्टेशन, पश्चिम द्रुतगती मार्ग, खार (पूर्व), मुंबई येथून सोडण्यात आल्या. सर्व प्रथम जिल्हा अध्यक्ष विरेंद्र म्हात्रे यांनी श्रीफळ फोडून पुजन केले. मग बस चालक किशोर कुमरे आणि वाहक सुभाष मोरे यांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देवून सन्मानित केले. तर जिल्हा उपाध्यक्ष राजेश दाभोळकर यांनी जिल्हा विरेंद्र म्हात्रे यांचा सत्कार केला. तेव्हा त्यांनी दाभोळकर परिवाराचे कौतुक केले. पुढे म्हणाले की, गणेश उत्सव हा आता राज्य उत्सव घोषित केला आहे. भाजपा आणि मित्र पक्ष हे उत्सव प्रेमी पक्ष आहे. कोणत्याही सणाला आम्ही बंदी आणली नाही, आणि आणून देणार नाही. जेवढ्या जेवढ्या बंदी आणल्या होत्या




ते सरकार आम्ही काढून टाकले आहेत. आणि यापुढेही या बंद्या राहणार नाही असा विस्वास देतो. या प्रसंगी जिल्हा उपाध्यक्ष अनिल मिश्रा, एड. यश मिश्रा , ओबीसी जिल्हा उपाध्यक्ष अनिल आयकर, वॉर्ड अध्यक्ष ९४ नवनाथ दिघे, मा. वॉर्ड अध्यक्ष लोकश दवे, दिनेश शिखरे, संदिप पवार,

## वाट चुकून राजकीय क्षेत्रात आलेले एक सर्वसामान्य प्रामाणिक, व्यक्तिमत्तव अनिलजी भोवड

**दैनिक युवक आधार**
**मुंबई:- (प्रमोद तरळ)**

समाजकारण , संघटन आणि नेतृत्व यांचा सुंदर संगम असलेले कुशल सघंटक, दमदार वक्ता,
मनमिळावू स्वभावाचे हळवे नेतृत्व श्री अनिलजी भोवड यांचा जन्मदिवस जल्लोषात साजरा करण्यात आला
. श्री भोवड यांच्या मित्र मंडळींनी त्यांच्या करता आयोजित केलेल्या वाढदिवसाच्या अभिष्टचिंतन सोहळ्यास सामाजिक आणि राजकीय तसेच सहकार अशा विविध क्षेत्रातील मान्यवर मंडळीं उपस्थित होती तसेच मित्र परिवारातील मंडळींनी हजर राहून त्यांना वाढदिवसाच्या मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या त्या शुभेच्छाचा स्विकार करून मा. अनिलजी भोंवड साहेब यांनी त्या सर्व मंडळींचे कृतज्ञता पूर्वक आभार व्यक्त केले.



यावेळी आवर्जून उपस्थित राहून शुभेच्छा देताना रत्नागिरी जिल्हा ओबीसी सेल अध्यक्ष तथा माजी जिल्हा संपर्क प्रमुख श्री. पांडुरंगजी उपळकर, रत्नागिरी जिल्हा महिला उपजिल्हा संघटिका सौं. उल्काताई विश्वासराव, राजापूर तालूका महिला संपर्क प्रमुख सौं. माधुरीताई मांजरेकर, राजापूर तालूका सहसंपर्क प्रमुख श्री नामदेव नार्वेकर, शिवसहकार सेना रत्नागिरी जिल्हा संघटक श्री सुधीर मोरे, दादरचे माजी शाखा प्रमुख श्री प्रवीण शेट्ये, लांजा भांबेड विभाग प्रमुख श्री मनोहर लांबोर, पाचल उप विभाग संपर्क प्रमुख श्री जनार्दन आगटे, कोदवली उपविभाग प्रमुख श्री संदीप नाचणेकर, श्री चंद्रकांत कांबळे, पंचक्रोशी ग्रामविकास समितीचे खजिनदार श्री अनिल राऊत, कार्याध्यक्ष श्री संतोष जोगले, राजापूर सन्मित्र सह पत संस्थेचे उपाध्यक्ष श्री परशुराम परवडे, संचालक श्री जयवंत नाचणेकर, सुधाकर गावडे, मनोहर गोरीवले, वामन कोकरे सी ई ओ श्री प्रभाकर वारिक, कुणबी युवाध्यक्ष वैभव वालम, प्रभाकर मांडवकर सोशल मीडियाचे विलास मुळम, मंदार आडीवरेकर, आमदार सुनीलजी राऊत यांचे स्विय सहाय्यक सुभाष मालप, आंगले गावचे गावकर बाळकृष्ण सौंदळकर, दिनेश कुडकर, दिनेश जाधव, गाव शाखा संघटक आदेश शिंदे, संजय मटकर, प्रकाश नाचणेकर,सुनील सुर्वे, मंगेश हातनकर, दादर युवासेनेचे सुशांत गोजारे, दिलीप शिगवण व सर्व शिवसैनिक समाज बांधव, हितचिंतक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पाडळी ते नागऱ्याची वाडी फाटा राज्य मार्गाचा सर्व्हे सुरु

### दिगंबर मळेकर यांच्या प्रयत्नांना यश

**दैनिक युवक आधार**
**शिरूर कासार**
**(प्रतिनिधी)**



तालुक्यातील नागऱ्याची वाडी फाटा ते राज्य रस्ता क्रमांक ६२ या राज्य मार्गाचे काम व्हावे म्हणून आर्वी,पाडळी,निमगाव, तिंतरवणी येथील लोकांनी सातत्याने गेल्या काही वर्षे पासून पाठपुरावा केला होता. सदरील रस्ता उथळा मध्यम प्रकल्पाच्या लाभ क्षेत्रातून जातो. हा पैठण निमगाव व आसपासच्या धार्मिक स्थळाला जोडणारा महत्त्वाचा रस्ता आहे. हा रस्ता दोन राष्ट्रीय महामार्ग व दोन राज्य मार्गाला दक्षिण-उत्तर जोडतो.त्यामुळे शिरूर तालुक्याच्या अविकसित भागात या रस्त्यामुळे फार मोठे नेटवर्क तयार होणार आहे.या रस्त्यामुळे ऊस वाहतूक,कापूस वाहतूक व इतर शेतमालाची वाहतूक फार मोठ्या प्रमाणात होणार आहे. या रस्त्याचा सर्वे करण्यात आला असून सेवानिवृत्त मुख्य अभियंता दिगंबर मळेकर यांच्या प्रयत्नांना यश आले आहे.या रस्त्याचा सर्व्हे सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपअभियंता जे.व्ही.मोरे,कनिष्ठ अभियंता एस.आर.चाटे व तांत्रिक सहाय्यक निलेश जाधव यांनी सुरू केला आहे.नागऱ्याची वाडी फाटा,पाडळी व आर्वी या राज्य मार्गाची लांबी,पूलाच्या जागा व इतर बाबीची पाहणी करून मोजणी केली आहे.केंद्रीय रस्ते विकासमार्ग निधीमध्ये याचा लवकरच प्रस्ताव होणार असून लवकरच या प्रकल्पाला मंजुरी मिळण्याची आशा आहे.

सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॅक, कलर व ४कलर
प्रिंटींग वाजवी दरात करुन मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

# पनवेलमध्ये रंगला शास्त्रीय नृत्याचा अद्वितीय सोहळा; “मयूखा” चे लॉन्चिंग

**दैनिक युवक आधार**
**पनवेल(प्रतिनिधी)**

एकाहून एक सरस शास्त्रीय नृत्याच्या सादरीकरणाने पनवेलची सांस्कृतिक भूमी भारतीय शास्त्रीय नृत्याच्या रंगांनी उजळून निघाली. समृद्ध नृत्य वारशाच्या जतन व प्रसारासाठी समर्पित असा "मयूखा महोत्सव" नृत्यार्पणा फाईन आर्ट्स सेंटरच्या वतीने आयोजित करण्यात आला होता. परंपरा आणि कलात्मकतेचा संगम असलेला हा महोत्सव नृत्याचा अद्वितीय सोहळा ठरला.

पनवेल शहरातील विरुपाक्ष मंगल कार्यालय येथे झालेल्या या महोत्सवाला प्रमुख मान्यवर म्हणून आमदार प्रशांत ठाकूर, आमदार विक्रांत पाटील, पनवेल महानगरपालिकेचे माजी सभागृहनेते व मयूखा महोत्सव प्रायोजक परेश ठाकूर, अर्चना ठाकूर, भाजपचे उत्तर रायगड जिल्हा सरचिटणीस





नितीन पाटील, माजी महापौर डॉ. कविता चौतमोल, माय भारत रायगड व रत्नागिरी विभागाचे उपसंचालक अमित पुंडे, भाजपचे पनवेल शहर मंडल अध्यक्ष सुमित झुंझारराव, नवीन पनवेल मंडल अध्यक्ष दशरथ म्हात्रे, नॅशनल टेलिफोन अॅडव्हायजरी कमिटी सदस्य श्री. रमेश कळंबोली, माजी नगरसेवक समीर ठाकूर, माजी नगरसेविका राजेश्री वावेकर, श्वेता शेट्टी, यमुना

"मयूखा" हे असे व्यासपीठ आहे जे केवळ शास्त्रीय नृत्यप्रकारांची गहनता आणि सौंदर्य प्रदर्शित करत नाही तर पुढील पिढीतील कलाकारांना प्रोत्साहन देते. नृत्यार्पणा फाईन आर्ट्स सेंटर या उपक्रमाद्वारे तरुण नर्तकांना प्रेरणा देण्याचे आणि प्रेक्षकांना भारताच्या पारंपरिक कलांचा खरा आस्वाद आणि संवर्धन करण्याचे प्रयत्न करते. त्यामुळे आता त्याचा प्रचार आणि प्रसार होण्यासाठी या महोत्सवाच्या माध्यमातून "मयूखा" चे लॉन्चिंग करण्यात आले आहे.

प्रकाशन विशेष पाहुणे म्हणून नालंदा नृत्यकला महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. उमा रेले, मोहिनीअट्टम नृत्यांगना व संस्थापिका निदेशिका डॉ. डिंपल नायर तर सेलिब्रिटी पाहुणे म्हणून मल्याळम अभिनेत्री व शास्त्रीय नृत्यांगना देवी चंदना, मराठी अभिनेत्री व शास्त्रीय नृत्यांगना तन्वी

आपला पनवेल म्हणजे आगरी, कोळी, कराडी, भंडारी, मराठा आणि विविध जातीच्या लोकांना सामावलेला परिसर आहे. जिथे नृत्य संगीत आणि त्याचबरोबर चांगले असे विचार घेऊन चालणारा समाजही या पनवेलची ओळख आहे. आता पनवेल परिसर हा कॉस्मोपॉलिटन असा समाज होत चालला आहे. पनवेलमध्ये हा मयूखा हा शास्त्रीय संगीताचा कार्यक्रम झाल्याबद्दल सर्व आयोजकांचे अभिनंदन. या कार्यक्रमांमुळे पनवेलची संस्कृती आणखी वाढत जाईल. येणाऱ्या काळात देखील अश्या प्रकारचे कार्यक्रम व्हावेत यासाठी श्री रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ आणि भारतीय जनता पार्टी चे नेहमीच सहकार्य लाभेल. - परेश ठाकूर, माजी सभागृहनेते पनवेल महानगरपालिका

पनवेल हे एक महानगरीय शहर बनत असताना, रस्ते आणि विमानतळांसारख्या भौतिक पायाभूत सुविधांवरच लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे. पण त्याच बरोबर आपली समृद्ध संस्कृती आणि परंपरा जपण्यावर देखील लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे. या गोष्टी खरोखरच आपल्याला परिभाषित करतात आणि आपल्याला एक महान राष्ट्र बनवतात. त्यामुळे आपल्या हा वारसा पुढच्या पिढीला देऊन त्यांना हा पुढे घेऊन चालवायचा आहे.- आमदार प्रशांत ठाकूर

पळव यांच्यासह सांस्कृतिक क्षेत्रातील मान्यवर आणि रसिक उपस्थित होते.

कलाकार, रसिक आणि सांस्कृतिक प्रेमींना एका व्यासपीठावर आणण्याच्या दृष्टिकोनातून पद्मभूषण डॉ. कनक रेले यांच्या शिष्या व नालंदा नृत्यकला महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थिनी नयना प्रकाश यांच्या संकल्पना व दिग्दर्शनाखाली हा उत्सव आयोजित आयोजित करण्यात आला होता. महोत्सवात नालंदा बानीतील मोहिनीआट्टमचे नयना प्रकाश यांचे जवळपास दिड तास मनमोहक सोलो सादरीकरण झाले. त्यांच्या सादरीकरणात लास्य आणि रौद्रम यांचा सुंदर समन्वय दिसून येत होता. त्यामुळे प्रत्येक नृत्यप्रयोग दृश्य व भावनिक दृष्ट्या अद्वितीय ठरला. या महोत्सवात नालंदा बानीतील मोहिनीयट्टम ख्यातनाम वादकांचा थेट वाद्यमेळ पनवेल व परिसरातील कला-रसिकांना एक सांस्कृतिक मेजवानी सुद्धा देऊन गेला. कलाश्री कलामंडलम सी. गोपाळकृष्णन यांच्या मार्गदर्शनाखाली नाट्यकलामंदिरम् सेंटर फॉर आर्ट्समार्फत त्याचे सादरीकरण झाले. त्यामुळे प्रेक्षकांना एक अद्वितीय असा सांस्कृतिक अनुभव अनुभवायला मिळाला. परंपरा आणि कलात्मकतेचा संगम असलेला हा कार्यक्रम रसिकांसाठी एक पर्वणी आहे.

## भंगार बेवारीस गाडी उचलून घेऊन जाणार का !

**दैनिक युवक आधार**
**मुंबई प्रविणभाऊ पवार**



खार पुर्व जवाहर नगर, साईबाबा रोड, खार (पुर्व) मुंबई येथील राजलक्ष्मी बिल्डिंग समोर गेली अनेक वर्षांपासून गाडी क्रमांक MH 01 AX 2284 टाटा नॅनो ही लाल रंगाची गाडी मोडकळीस व बेवारस अवस्थेत रस्त्याच्या कडेला पडून आहे.
या गाडीच्या सर्व काचा फुटलेल्या आहेत. त्याचबरोबर गाडीचे सर्व पत्र्यानां गंज लागून गाडी मोडकळीस अवस्थेत आहे. या बेवारस गाडीच्या आतमध्ये कोणीही वस्तू ठेवू शकतो. अनेक लोक यांचा गैरवापर करत असतात. यांच्या आत कचरा टाकलेला आहे. या बेवारस गाडीमुळे भविष्यात येथे मोठा धोका व अनर्थ होऊ शकतो. महानगरपालिकेने रस्त्यावरील बेवारस वाहनांविरोधात मोहीम तक्रार नोंदवण्यासाठी व्हॉट्स अप करा. पश्चिम उपनगरे येथे फोन केला तो स्विच ऑफ दाखवत आहे. येथे फारसा प्रतिसाद मिळालेला नाही. तेव्हा संबंधित एच.पुर्व. महानगरपालिका विभाग व वाहतूक पोलीस BKC विभागाने ही बेवारस गाडी उचलून घेऊन जाण्याची प्रयत्न करावे. हि जागा पुर्वी प्रमाणे मोकळी करावी.

## श्री क्लासेस संचलित शितल अकॅडमी माळी वाडा एरंडोल येथे मोफत आरोग्य तपासणी शिबीर संपन्न




**दैनिक युवक आधार**
**जळगाव जिल्हा प्रतिनिधी समाधान पाटील**

**एरंडोल** – येथील *शितल अकॅडमी, माळी वाडा* येथे शुक्रवार व शनिवार रोजी मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात शेकडो नागरिकांनी सहभाग घेतला. या उपक्रमात स्थानिक टीमने *रक्तदाब, मधुमेह, हिमोग्लोबिन, बीएमआय, ईसीजी* अशा विविध तपासण्या केल्या. विशेषतः महिलांसाठी व विद्यार्थ्यांसाठी वेगळ अस आरोग्य सल्ला सत्र आयोजित करण्यात आले होते शितल अकॅडमीचे संचालक श्री. योगेश महाजन सर* यांनी या उपक्रमाबद्दल आनंद व्यक्त करत सांगितले की, "आरोग्य ही खरी संपत्ती आहे. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक विकासासोबतच शारीरिक आरोग्य टिकवणे हे आमचे उद्दिष्ट आहे."
कार्यक्रमाच्या शेवटी सर्व सहभागी नागरिकांना आरोग्य सल्ला पुस्तिका आणि आवश्यक औषधे मोफत देण्यात आली. शैक्षणिक वर्षात असे अनेक समाज उपयोगी असे उपक्रम राबविण्यात येतात.

## चोरीला गेलेली गाडी नदीत सापडली

**दैनिक युवक आधार**
**पनवेल, वार्ताहर**

: रात्रीच्या वेळी चोरलेली गाडी अज्ञात चोरट्याने गावाजवळील नदीत टाकून तो पसार झाल्याची घटना घडली असून गावकऱ्यांना याबाबतची माहिती मिळताच त्यांनी ती गाडी पाण्यातून बाहेर काढली आहे.
पनवेल जवळील भिंगारी येथे कांदेवाडी या ठिकाणी राहणाऱ्या एका डबेवाल्यांची दुचाकी गाडी ज्याची किंमत जवळपास 1 लाख 40 हजार रुपये इतकी आहे ती अज्ञात चोरट्याने चोरली. ही चोरी त्या भागातील सीसीटीव्हीमध्ये दिसून आली आहे. त्यानंतर सदर गाडी ही गावाजवळील नदीमध्ये टाकून दिल्याचे आढळून आले आहे. ग्रामस्थांनी त्वरित तेथे धाव घेवून सदर गाडी पाण्यातून बाहेर काढली आहे. आता अज्ञात चोरट्याचा शोध ग्रामस्थ करीत आहेत.
फोटो : पाण्यातून गाडी बाहेर काढताना ग्रामस्थ



## मुरुडमध्ये जनता दरबारातील घटना सोशल मीडियावर झाली वायरल !

**दैनिक युवक आधार**
**लातूर (प्रतिनिधी) मोहम्मद पिंजारी**

लातूर ग्रामीणचे आमदार रमेश कराड यांनी गेल्या महिन्यात मुरुड येथे आयोजित केलेल्या जनता दरबारामध्ये घडलेली एक घटना सध्या सोशल मीडियावर जोरदार व्हायरल होत आहे. या दरबारात एक व्यक्ती आपल्या अडचणी सांगण्यासाठी थेट आमदारांच्या व्यासपीठावर पोहोचली होती. त्यावेळी मुरुडचे उपसरपंच हनुमंत नागटिळक यांनी त्या व्यक्तीस ढकलून खाली उतरवले, असा व्हिडिओ नागरिकांनी मोठ्या प्रमाणात शेअर केला आहे

या घटनेनंतर गावकऱ्यांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. संबंधित व्यक्तीचे मानसिक स्वास्थ्य ठीक नसल्याचे कारण देत उपसरपंचांनी आपली बाजू मांडली होती. मात्र, लोकांसमोर सर्वांच्या उपस्थितीत अशा पद्धतीने वागणे कितपत योग्य होते, हा मोठा प्रश्न उपस्थित झाला आहे. प्रशासनाशी संबंधित लोकांना साध्या नागरिकांशी अधिक संयम, जबाबदारी आणि आदर ठेवण्याची अपेक्षा केली जाते, असे मत नागरिकांतून व्यक्त होत आहे

या घटनेवर स्थानिक राजकीय वर्तुळातही चर्चा रंगली आहे. सोशल मीडियावर सतत फिरणाऱ्या या व्हिडिओमुळे लोकप्रतिनिधींच्या आचारसंहितेवर प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे. जनता दरबार हे ठिकाण नागरिकांच्या अडचणी ऐकून त्या सोडविण्याचे असते; मात्र इथेच एखाद्या नागरिकासोबत अशा प्रकारे वागणूक झाल्याने लोकांमध्ये असंतोष पसरला आहे. आता याप्रकरणी आमदार रमेश कराड यांची काय भूमिका असेल याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## शिवभक्त प्रथमेश भास्कर पुंडे यांच्या संकल्पनेतून करंजाडेकरांची शिवनेरी वारी.... जयघोषांनी शिवनेरी दुमदुमला

**दैनिक युवक आधार**
**पनवेल प्रतिनिधी**

छत्रपतींचा आदर्श,विचार समोर ठेवून करंजाडेतील जनसामान्यात रुजावे आणि आदर्श समाज निर्माण व्हावा यासाठी गडकिल्ले संवर्धन आणि दर्शन नियोजन करण्यात येते.
या मोहिमेत युनेस्कोने घोषित केलेल्या UNISCO WORLD HERITAGE SITE (जागतिक वारसा स्थळ)वरील दुर्गराज रायगड वारी, किल्ले लोहगड दर्शन आणि 17 ऑगस्ट 2025 रोजी 135 शिवभक्तांच्या सहभागातून शिवनेरी दर्शन मोहीम पार पडली.
बुद्धी,संघर्ष,शौर्य आणि पराक्रमातून सामर्थ्यशाली भारत राष्ट्र उभ राहिलय ते हिंदवी स्वराज्य संस्थापक छत्रपती



शिवाजी महाराजांच्या आणि स्वराज्या साठी बलिदान दिलेल्या मावळ्यांचा कर्तृत्वावर.हिंदुस्थानच्या क्षितिजावर आजही एकच नाव कोरलेले आहे ते म्हणजे छत्रपती शिवाजी महाराज.
स्पर्धात्मक युगात लढण्याचे बळ म्हणजे शिवविचार आणि आदर्श.
करंजाडे,पनवेल मधील रहिवाश्यांनी किल्ले शिवनेरीवर इतिहासिक वास्तू पाहिल्या व अनुभव घेतला. शिवाई देवीचे दर्शन घेऊन आशिर्वाद घेतला.
किल्ले शिवनेरी दर्शन मध्ये 3 AC बस व चारचाकी वाहन समावेश होती.
नाष्टा,जेवण,फळ,बिस्कीट,चॉकलेट व पाण्याची उत्तम सोय करण्यात आली.
तसेच भाग्यवान शिवभक्त म्हणून 4 शिवभक्तांना विठ्ठल रुक्मिणी व भक्ती शक्ती मूर्ती देऊन गौरविण्यात आले.
तसेच महाराजांच्या इतिहासाबद्दल प्रश्न विचारून विजयी शिवभक्तांचा सन्मानचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले.
छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास व्याख्यानातून सांगून वैदेही मोरे यांनी सर्वांची मणं जिंकली.
सह्याद्रीच्या प्रवासातील अविस्मरणीय अनुभव करंजाडेकरांनी अनुभवला.
श्री.प्रथमेश भास्कर पुंडे आणि सहकाऱ्यांच्या पाठीवर शाबासकीची थाप टाकत पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या.
योग्य नियोजन,मार्गदर्शन,नेतृत्व क्षमता यामुळे किल्ले शिवनेरी प्रवास सुखरूप झाला.

## बालरंगभूमी परिषद बृहन्मुंबई शाखेतर्फे 'इतिहास महाराष्ट्राचा' स्पर्धा संपन्न.

**दैनिक युवक आधार**
**विकास वायाळ मुंबई प्रतिनिधी**

मुलांना इतिहासातील महान व्यक्तिमत्त्वाचे ज्ञान व्हावे, त्यांचा इतिहास कळावा, त्यांच्या शौर्य-कथा कळाव्या या प्रामाणिक उद्देशाने माननीय बालरंगभूमी परिषद मुंबई शाखेच्या अध्यक्षा माननीय नीलम ताई शिर्के-सामंत आणि त्यांच्या मध्यवर्ती समितीतील सदस्यांनी हा अतिशय स्तुत्य उपक्रम जाहीर केला .सर्व शाखांनी हा कार्यक्रम आपापल्या शाखेत राबविला. बृहन्मुंबई शाखेनेही पावसाने थैमान घातल्यामुळे हा उपक्रम ऑनलाइन घेतला.

शिवाजी महाराजांच्या काळातील कुठलही व्यक्तिमत्त्व सादर करणे, हा पहिल्या एकल गटाचा विषय म्हणजे ५ते१० वर्षे वयाच्या मुलांचा. शिवाजी महाराजांच्या जन्मापासून राज्याभिषेकापर्यंत




कुठलेही प्रसंग सादर करणे हा गट नंबर दोन एकल ,म्हणजेच ११ ते १५ वर्षे वयाच्या मुलांचा विषय .आणि महाराजांच्या जन्मापासून राज्याभिषेकापर्यंत कुठलाही प्रसंग समूहाने सादर करणे हा विषय होता पाच ते पंधरा या वयातील मुलांचा.


८३ मुलांनी या स्पर्धेत भाग घेतला .कथा, पोवाडा ,नाटुकले, पाळणा, नाट्यछटा ,गाणी इत्यादी विविध कलाप्रकार मुलांनी सादर केलेत. सगळ्यांचेच सादरीकरण अतिशय सुंदर होते .तेही इतक्या कमी वेळात त्यांनी ते सादर केलेत. शाळांच्या परीक्षा होत्या, सुट्ट्या होत्या, पाऊस होता तरीही शाळांनी, संस्थांनी स्पर्धेत भाग घेतला .त्यासाठी सगळ्याच शाळांचे, संस्थांचे, त्यांना प्रेरित करणाऱ्या शिक्षकांचे मनःपूर्वक आभार.

ज्येष्ठ अभिनेते, दिग्दर्शक, निर्माते माननीय श्री.अनंत पेडणेकर आणि अभिनेते ,डान्सर कोरिओग्राफर, डबिंग आर्टिस्ट, 'कलाविष्कार कला अकॅडमी' आणि' कलाविष्कार एंटरटेनमेंट आणि प्रोडक्शन हाऊस' चे संस्थापक श्री. निखिल चव्हाण यांनी परीक्षक म्हणून अतिशय पारदर्शकपणे काम केले.

या स्पर्धेच्या यशस्वीतेसाठी बृहन्मुंबई शाखेच्या कार्याध्यक्षा ज्योती निसळ,आसिफ अन्सारी, विश्वास धुमाळ, कृष्णा पाटील आणि माध्यम प्रमुख गणेश तळेकर यांनी सहकार्य केले.

## रिसोडः श्रीमद् भागवत कथा सप्ताहाचा उत्साहात समारोप!

दैनिक युवक आधार
रिसोड तालुका प्रतिनिधी. रणजितसिह. ठाकूर
रिसोड शहरातील माहेश्वरी भवना
येथे श्रीमद् भागवत सप्ताहाचे आयोजन निर्वाण परिवार यांच्या
संयुक्त विद्यमाने करण्यात आले होते.
सर्वप्रथम दि.१५/८/२०२५ शुक्रवारला सकाळच्या सत्रात श्री हनुमान माउंटर, छ. शिवाजी महाराज चौकातून महेश्वरी भवनात शोभा यात्रा रथातून उत्सव काढण्यात आली.प्रवचनकार श्री राहुलजी राजूरकर (बोरीकर)(मी.रा)महाराज यांनी प्रवचनातून सप्तम दिवस। भगवान द्वारा ०८पटरानियों को अपनाना। १६१०८पटरानी कथा । सुदामा चरित्र. महाभारत के काही प्रसंग. जरासंध वध. भगवान के कुल का नाश श्रीकृष्णांचा त्यांचा धामजाजा परिक्षीत जी को मोक्ष की प्राप्ती भगवान द्वारे राधा जी को मनाना कंस का वध.सुदामा आणि श्रीकृष्ण की गुरुकुल में मिलना। उद्धव प्रसंग. रुख्मीनी विवाह.यासह धार्मिक अशा विविध विषयांवर भक्तांना



मोलाचे सप्ताहादरम्यान मार्गदर्शन केले. दैनंदिन कार्यक्रमात भागवत, प्रथम श्लोक विषय चर्चा.शुकदेवजींचा जन्म. धुन्धकारी कथा.श्रीमद्भागवत ज्ञान यज्ञ की विधी भक्ती,ज्ञान आणि वैराग्य की कथा.भागवत अवतारों की कथा, वेद व्यास को नारद जी द्वारा ज्ञान देणे आणि अंत भागवत लिहिणे,महाभारत के प्रसंग. शुकदेवजी द्वारा राजा परिक्षीत को श्रीमद् भागवत सुनाना,वराह अवतार कथा ध्रुव चरित्र शिव विवाह पृथ चरित्र भरत चरित्र।गयासुर कथा. अजमिल कथा. राजा दक्ष आणि जरद प्रल्हाद चरित्र.जी की कथा,गजेंद्र मोक्ष चतुर्थ दिषः धर्म काय आहे? श्रीराम जन्म.श्रीकृष्णजन्म समुद्र मंथनवामन अवतार राजा अमरिश की तृणावत वद्य पंचम विषस भगवान श्रीकृष्ण कीलाए पुतना वद्य. शक्तासुर वध आझासुर वध चंद्रमा भगवान चाहिए की जिद्द माखन चोरी.नामकरण राधा जी से विवाह की जिद गेला चरणे जाणेवस्त्र हरण ब्रह्माजी द्वारा भगवान की परिक्षा लेना
या माध्यमातून समारोपप्रसंगी प्रतिष्ठित नागरिक प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.उपस्थित अतिथींचा शाल,श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. महाप्रसादाने भागवत सप्ताहाचा समारोप करण्यात आला कार्यक्रमाचे यशस्वीतेसाठी सालासर, नवयुग मंडळ सदस्यांनी अहोरात्र परिश्रम घेतले.

# जिवंतपणी संघर्ष, मृत्यूनंतरही हेळसांड; रस्त्याअभावी रखडली अंत्ययात्रा

## पुरोगामी महाराष्ट्रात अंत्ययात्रेसाठी ट्रॅक्टरचा आधार

**दैनिक युवक आधार**
**निफाड तालुका प्रतिनिधी राजेश भडांगे**
**कोळगावः- कोळगाव ता.निफाड येथील** स्व.प्रकाश दत्तात्रय घोटेकर (वय ३९) यांचे दि.२३ ऑगस्ट रोजी रात्री ९.४५ वाजता दुर्दैवी निधन झाले. मात्र स्मशानभूमीकडे जाणारा रस्ता उपलब्ध नसल्याने अंत्ययात्रा रखडली व मृतदेह १४ तास घरातच ठेवावा लागला. त्यामुळे रस्त्यासाठी जिवंतपणी संघर्ष... मृत्यूनंतरही हेळसांड!' अशा शब्दांत कोळगावातील ग्रामस्थ व नातेवाईकांनी आपला संताप व्यक्त केला.

स्व.प्रकाश यांच्या निधनानंतर अंत्यविधीची तयारी सुरू झाली; पण स्मशानभूमीकडे जाणाऱ्या



रस्त्याची अत्यंत दुरावस्था झाली असल्याने रात्री चिखल तुडवत जाणे शक्य नव्हते. त्यामुळे मृतदेह घरातच ठेवावा लागला. जवळपास सकाळी १२ वाजेपर्यंत नातेवाईक व ग्रामस्थ अंत्ययात्रेच्या प्रतीक्षेत होते. अखेर ग्रामस्थांनी ठरवून ट्रॅक्टरवरून अंत्ययात्रा काढण्यात आली. दुपारी १ वाजता गोदावरी नदीकाठी अंत्यविधी पार पाडण्यात आला. या घटनेमुळे उपस्थितांच्या डोळ्यात अश्रू तर होतेच; पण

> रस्त्याअभावी जिवंतपणी संघर्ष आणि मृत्यूनंतरही अपमान... असा प्रसंग फक्त आपल्या पुरोगामी महाराष्ट्रातच का घडतो? लोकप्रतिनिधींच्या येवला - लासलगाव मतदारसंघातील दुर्लक्षाचे भोग आम्हाला किती काळ भोगावे लागणार?
>
> **:-दत्तात्रय घोटेकर**

मनात प्रशासनाविषयी रोषही होता.

देवगाव ते कोळगाव या रस्त्याची अत्यंत दुरावस्था झाली आहे. या रस्त्याचे निदान खडीकरण व्हावे अशी अनेक वर्षांपासून मागणी सुरू आहे. अनेक वेळा निवेदने देऊनही लोकप्रतिनिधी व प्रशासनाने याकडे दुर्लक्षच केले आहे. या रस्त्यासाठी मागील महिन्यात गावातील तरुण, महिला व शालेय विद्यार्थी यांनी एकत्र येत साखळी उपोषण केले होते. रस्ता मंजूर व्हावा यासाठी मोठा आवाज उठवण्यात आला होता. तरीदेखील अद्याप कोणताही ठोस निर्णय किंवा उपाययोजना झालेली नाही.

या घटनेनंतर गावात संतापाची लाट उसळली आहे. 'आज अंत्ययात्रा रखडली, उद्या आणखी कोणते संकट येईल सांगता येत नाही. आता तरी प्रशासनाने जागे व्हावे, अन्यथा गावकऱ्यांना तीव्र आंदोलनाचा मार्ग स्वीकारावा लागेल असा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे.

# शिंगोर्णी येथील प्राचीन काळातील श्री महादेव मंदिराचे दर्शन घेण्यासाठी भाविकांची बहु गर्दी”

**दैनिक युवक आधार**
**शिंगोर्णी प्रतिनिधी आकाश जाधव**
सांगली सातारा सोलापूर जिल्ह्याच्या सरहद्दीवर असणाऱ्या शिंगोर्णी येथील श्री महादेवाचे मंदिर हे अंदाजे साडेतीनशे वर्षांपूर्वीचे आहे. श्रावण महिन्यात या ठिकाणी असंख्य भाविक भक्त मोठ्या श्रद्धेने दर्शनासाठी येत असतात. श्रावणातील शेवटच्या सोमवारचे औचित्य साधून संस्कृती पद्धतीने गजी ढोलचे पारंपारिक खेळ दाखवण्यात आले. त्याचबरोबर सकाळी आलेल्या भाविकांना अल्पोपहार देण्यात आला व महाप्रसादाचेही वाटप करण्यात आले. धार्मिक विधी अतिशय उत्साहात पार पाडले. यावेळी शिंगोर्णी चे ज्येष्ठ नेते व पंचायत समितीचे माजी सदस्य उद्योगपती श्री शहाजी महाडिक, मा. उपसरपंच विठ्ठल कदम मा सरपंच नानासाहेब गोडसे मा



उपसरपंच डॉ गजानन कदम, ग्रामपंचायत सदस्य अनिल जाधव, तानाजी गायकवाड, शामराव गायकवाड, पोपट कदम, बाबासाहेब कदम, रावसाहेब कदम ,छगन कदम, एकनाथ गायकवाड, रमेश गायकवाड रणजीत भारत जाधव ,कोंडीबा जाधव गायकवाड ,प्रशांत गायकवाड, नवनाथ गजू कदम ,दत्तात्रय कदम, दादासाहेब जाधव ,बाळू जाधव, सुनील कदम, राहुल धांडोरे, गणेश कदम, रणजीत कदम व अनेक तरुण मंडळींनी याचे नियोजन करून परिश्रम घेतले. व या कार्यक्रमाला सर्वजण उपस्थित राहिल्याबद्दल सर्वांचे नियोजन समितीच्या वतीने आभार मानण्यात आले.

# गणेशोत्सवात ऑपरेशन सिंदूर,नशा मुक्त रायगड - नशा मुक्त भारत, महिला सुरक्षा व सक्षमीकरण असे देखावे साकारावे -- सहा.पो.नि. सचिन कुलकर्णी

## शांतता कमिटीत केले आवाहन

**दैनिक युवक आधार**
**नागोठणे वार्ताहर**
नागोठणे येथील पोलिस ठाण्यात शुक्रवार 22 ऑगस्ट रोजी सकाळी आगामी येणारे गणेशोत्सव,ईद ए मिलाद या सणांच्या अनुषंगाने पोलिस ठाण्याचे सहा.पो.नि. सचिन कुलकर्णी यांच्या उपस्थितीत घेण्यात आलेल्या शांतता कमिटीच्या बैठक घेण्यात आली. यावेळी सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाने ऑपरेशन सिंदूर,इंडियन मिलिटरी पॉवर,नशा मुक्त रायगड - नशा मुक्त भारत, महिला सुरक्षा व सक्षमीकरण अशा प्रकारचे देखावे साकारावे असे आवाहन सहा.पो.नि. सचिन कुलकर्णी यांनी केले. यावेळी उपसरपंच अकलाक पानसरे,माजी सरपंच विलास चौलकर,ग्रा.पं.सदस्य ज्ञानेश्वर साळुंखे,सिराज पानसरे, निलोफर पानसरे,नंदाताई गायकवाड, कांचन शेळके,के.के.कुथे,सोपान जांबेकर,गणेश घाग,इम्रान पानसरे,संतोष



कावेडिया,वसीम बोडेरे यांच्यासह कमिटी सदस्य,विभागातील पोलिस पाटील, सार्वजनिक गणेश मंडळांचे पदाधिकारी व ग्रामस्थ उपस्थित होते. सचिन कुलकर्णी यांनी उपस्थिततताणणा मार्गदर्शन करताना सर्व सण उत्सव कालावधीत कोणत्याही प्रकारे जातीय तणाव अथवा जातीय वाद होणार नाहीत याची सर्वांनी दक्षता घ्यावी,सोशल मिडियावर जातीय तेढ निर्माण करणारे मेसेज अथवा बाहेरून येणारे मेसेज टाकू नयेत, तसे कोणी करत असेल तर त्यास वेळीच आवर घालावी व त्याची माहिती पोलिसांना द्यावी, सणाचा कालावधी असल्याने सर्वांनी वाहतूक नियमांचे पालन करावे, रस्त्यामध्ये अथवा गर्दीचे ठिकाणी वाहन पार्किंग करू नये, सार्वजनिक गणेश मंडळाने गणेशमूर्ती स्थापन होणाऱ्या मंडपात सीसीटीव्ही कॅमेरे लावावेत तसेच या ठिकाणी दिवसरात्र स्वयंसेवक ठेवावेत व त्यांची यादी पोलीस ठाण्यात द्यावी, पारंपरिक वाद्यांचा वापर करण्यात यावा,गणेशोत्सव मंडळाने ऑपरेशन सिंदूर,इंडियन मिलिटरी पॉवर,नशा मुक्त रायगड - नशा मुक्त भारत, महिला सुरक्षा व सक्षमीकरण अशा प्रकारचे देखावे साकारावे, DJ सारख्या मोठ्या आवाजाचे वाद्यांचा वापर करू नये,गणेश मंडळांनी विद्युत रोषणाई करण्यासाठी महावितरण विभागाकडून अधिकृतरित्या विद्युत कनेक्शन घ्यावे, गणेश मूर्ती विसर्जनाच्या वेळी महिला व मुली यांची छेडछाड होणार नाही याची सर्व गणेश मंडळांनी नोंद घ्यावी,श्री.गणेश मूर्ती स्थापना व विसर्जन मिरवणूक या वेळेत सुरु करुन वेळेत समाप्त कराव्यात, सर्व गणेश मंडळाने परवानगी करिता आपले सरकार पोर्टल वर ऑनलाईन पद्धतीने अर्ज करावेत असे सांगून अर्जायाकरिता न्याय सारथी अप बाबतची माहिती शेवटी कुलकर्णी यांनी दिली. यावेळी अनेक मान्यवरांनी आपल्या समस्या व सूचना मांडल्या.

# तान्हया (लाकडी बैल) पोळ्याला 236 वर्षे पूर्ण नागपूरात सर्वात मोठा लाकडी बैल.

**दैनिक युवक आधार**
**सतीश कडू नागपूर विभागीय संपादक**
नागपूर शहरात पोळा झाल्यानंतर दुसऱ्या दिवशी तान्हा पोळा भरवण्याची परंपरा वर्षानुवर्ष सुरु आहे. यंदा लाकडी बैलांच्या (तान्हा ) पोळ्यास 236 वर्ष पूर्ण होत आहेत. भारत हा कृषी प्रधान देश असून भारतात सर्वत्र पोळा बैलांचा सण म्हणून साजरा केल्या जातो. पोळ्याच्या दुसऱ्या दिवशी म्हणजे तान्हा पोळा या दिवशी लहान मुले लाकडी बैलांचा पोळा साजरा करतात. *विदर्भ* वगळता कुठेच हा पोळा साजरा केला जात नाही. *सन 1789* मध्ये दुसरे *श्रीमंत राजे रघुजी महाराज भोंसले (द्वितीय)* यांनी हा उत्सव सुरु केला. लहान बालगोपालांना बैलाचे महत्व कळावे. म्हणून *लाकडी बैल (तान्हा ) पोळ्याची* सुरुवात केली. *श्रीमंत राजे रघुजी महाराज भोंसले (द्वितीय)* यांनी लाकडी बैल तयार करून मागविले व सर्व लहान मुलांना ते वाटण्यात आले. जिवंत बैला प्रमाणे त्या बैलांना सजविण्यात आले. आंब्याचे तोरण लावून त्याला जिलेबी, फळं, आता चॉकलेट, बिस्कीट पुडे, अशा विविध वस्तूंनी तयार केलेले तोरण बांधून त्यामध्ये मुलांना उभे करून बैलांची पूजा करण्यात यायची. पूजा संपल्यानंतर तोरण तोडून पोळा फोडून वाजत गाजत हनुमान खिडकी चे दर्शन घेऊन हनुमानाला नारळ फोडून परत आल्यावर मुलांना खाऊ, पैसे, वाटण्यात यायचे. या *प्रथेला 236 वर्षे* पूर्ण होत आहे. *राजे मुधोजी महाराज भोंसले* यांनी ही प्रथा आजही कायम ठेवली आहे. *राजे मुधोजी महाराज भोंसले* यांच्या वाड्यात सर्वात मोठा लाकडी बैल आहे. आज सुद्धा एवढा मोठा बैल भोंसले घराण्याकडे आहे. *मुधोजीराजे* चे निवासस्थान *सिनियर भोंसला पॅलेस, महाल, नागपूर* येथे हा बैल आहे. या लाकडी बैलांची *उंची आठ फूट, लांबी सहा फूट* असून या बैलांच्या पायात *चांदीचा तोडा* घातला आहे. ज्या पद्धतीने *श्रीमंत राजे रघुजी महाराज भोंसले (द्वितीय)* वाजत गाजत मिरवणूक काढायचे त्याच परंपरेला अनुसरून दरवर्षीप्रमाणे यावर्षी दि 23/08/2025 ला दुपारी 04.00 वाजता मोठ्या प्रमाणात मिरवणूक निघणार. 236 वर्षानंतर आजही सुद्धा ही प्रथा *राजे मुधोजी महाराज भोंसले* यांनी नियमीत ठेवली व यापुढेही सुद्धा ही प्रथा चालू राहील असे मत महाराजांनी व्यक्त केलेले आहे.

# किनवट तालुक्यामध्ये अतिवृष्टिने नुकसान झालेल्या शेतीची पाहणी

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी भालेराव किनवट**
किनवट तालुक्यातील करंजी या गावी पाहनी



दैनिक युवक आधार. किनवट प्रतिनिधी दिलीप भालेराव मागील चार दिवसापासून किनवट तालुक्यामध्ये सतत पाऊस झाल्याने शेतीचे 90 टक्के नुकसान झालेली असल्यामुळे किनवट कृषी विभागातील साहय्यक कृषी अधिकारी केदार मॅडम यांनी पाहणी केली. असता सततच्या पावसामुळे शेतकऱ्याच्या सोयाबीन या पिकाला बुरशी लागून सोयाबीन पिवळ पडले व झाड सुकून गेले व हळद या पिकांना सुद्धा बुरशी लागली आहे व पिकांना सुद्धा बुरशी लागली आहे व कापसाचे भरपूर नुकसान झाले आहे. बुरशी लागलेल्या पिकांना बुरशीनाशक व गंधकाची फवारणी करावी असे केदार मॅडम यांनी शेतकऱ्यांना सांगितले पण या फवारणीमुळे पिकामध्ये सुधारणा होते की नाही याची भिती शेतकऱ्यामध्ये आहे तरी शासनाने लवकरात लवकर शेतीचे पंचनामे करून शेतकऱ्यांना लवकर मदत द्यावी.

बाबुराव पाटील इंगळे, गंगाधर कोलेवार, अशोक भालेराव, देविदास भालेराव, विलास भालेराव.

# मुरुडमध्ये जनता दरबारातील घटना सोशल मीडियावर झाली वायरल !

**दैनिक युवक आधार**
**लातूर (प्रतिनिधी) मोहम्मद पिंजारी**
लातूर ग्रामीणचे आमदार रमेश कराड यांनी गेल्या महिन्यात मुरुड येथे आयोजित केलेल्या जनता दरबारामध्ये घडलेली एक घटना सध्या सोशल मीडियावर जोरदार व्हायरल होत आहे. या दरबारात एक व्यक्ती आपल्या अडचणी सांगण्यासाठी थेट आमदारांच्या व्यासपीठावर पोहोचली होती. त्यावेळी मुरुडचे उपसरपंच हनुमंत नागटिळक यांनी त्या व्यक्तीस ढकलून खाली उतरवले, असा व्हिडिओ नागरिकांनी मोठ्या प्रमाणात शेअर केला आहे




या घटनेनंतर गावकऱ्यांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. संबंधित व्यक्तीचे मानसिक स्वास्थ्य ठीक नसल्याचे कारण देत उपसरपंचांनी आपली बाजू मांडली होती. मात्र, लोकांसमोर सर्वांच्या उपस्थितीत अशा पद्धतीने वागणे कितपत योग्य होते, हा मोठा प्रश्न उपस्थित झाला आहे. प्रशासनाशी संबंधित लोकांना साध्या नागरिकांशी अधिक संयम, जबाबदारी आणि आदर ठेवण्याची अपेक्षा केली जाते, असे मत नागरिकांतून व्यक्त होत आहे

या घटनेवर स्थानिक राजकीय वर्तुळातही चर्चा रंगली आहे. सोशल मीडियावर सतत फिरणाऱ्या या व्हिडिओमुळे लोकप्रतिनिधींच्या आचारसंहितेवर प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे. जनता दरबार हे ठिकाण नागरिकांच्या अडचणी ऐकून त्या सोडविण्याचे असते; मात्र इथेच एखाद्या नागरिकासोबत अशा प्रकारे वागणूक झाल्याने लोकांमध्ये असंतोष पसरला आहे. आता याप्रकरणी आमदार रमेश कराड यांची काय भूमिका असेल याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# मा.नगरसेवक तथा भाजप उत्तर रायगड जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त वृद्धाश्रमात नाश्त्याचे वाटप

**दैनिक युवक आधार**
**पनवेल, (वार्ताहर)**
मा. नगरसेवक तथा भाजपा उत्तर रायगड जिल्हा सरचिटणीस नितीन जयराम पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त भानघर येथील करुणेश्वर ओल्ड एज केअर हाऊस येथे नाश्त्याचे आयोजन करण्यात आले.

या उपक्रमाचे आयोजन भाजपा उत्तर रायगड जिल्हा चिटणीस (ओबीसी मोर्चा) प्रसाद म्हात्रे यांच्या वतीने करण्यात आले होते. या वेळी भाजपा सोशल मीडिया संयोजक प्रसाद हनुमंते यांच्या प्रमुख उपस्थितीत नरेंद्र सोनवणे, चंद्रकांत पंडित सर, युवा मोर्चा सदस्य सद्दाम बागवान, रोहित म्हात्रे, अजय बलखंडे, माजीद बागवान, संतोष वर्तले, शुभम बेद, अमन बेद, आदित्य गायकवाड आदी मान्यवर उपस्थित होते.



# धनज येथे दुधागिरी देवीची यात्रा भाविकांची गर्दी

**दैनिक युवक आधार**
**उमरखेड तालुका प्रतिनिधी**
**राजु गायकवाड**
धनज येथे धार्मिक आणि सांस्कृतिक महत्त्व दुधागिरी यात्रेला परंपरा नुसार दिले जाते देव-देवतांवरील विश्वासामुळे ग्रामस्थ यात्रेला विशेष स्थान देतात गावातील सर्व समाजातील लोक एकत्र येऊन भक्तिभावाने सहभागी होतात, त्यामुळे बंधुभाव व एकात्मता दृढ होत जाते या यात्रे च्या आधी गावामध्ये कीर्तन, भजन, आणि सात दिवसाचा सप्ताह ठेवला जातो त्यामध्ये गावातील सर्व लहान थोर मंडळी महिला यांचा समावेश असतो सोबतच यात्रा ही व्यापारी लोकांसाठी मुख्य साधन असते ज्यामंध्ये हॉटेल, कपडे, खेळणी, मिठाई इत्यादींचा मोठा बाजार भरतो यामुळे त्यांना पण चांगला फायदा होतो दुधागिरी यात्रेत गावोगावी, दूरवरून लोक येतात. ग्रामीण भागातील सर्वसामान्यांसाठी ही मोठी आनंदाची पर्वणी असते यामध्ये गावातील लोक सामाजिक एकात्मता जपतात जाती-धर्म भेद न करता सर्व लोक यात्रेत सहभागी होतात त्यामुळे सामाजिक ऐक्य वाढते आणि विशेष म्हणजे गावाच्या संस्कृतीचे जतन केले जाते आणि गावात उत्सवाचे वातावरण निर्माण होते आणि विशेष गावात आणि मंदिर परिसरात दिवसरात्र सणासारखी गजबज असते यात्रेसाठी येणाऱ्या भाविकांसाठी महाप्रसादाची व्यवस्था केलेली असते.

> धनज येथे परंपरे नुसार दुधागिरी देवींची यात्रा होत असते यामध्ये मुळावा परिसरातील भाविक जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहतात लोकांची आस्था आणि गावकर्यांच्या सहकार्याने ही यात्रा चांगली पार पडते यासाठी स्थानिक लोकांचे चांगले सहकार्य लाभते..
>
> **अंबादास धुळे**
> **सामाजिक कार्यकर्ते**



# अदानी फाउंडेशनतर्फे आदगांवमध्ये मोफत आरोग्य शिबिर : १६३ जणांनी घेतला लाभ



**दैनिक युवक आधार**
**पंडीत फंगाळ (पनवेल):**
अदानी फाउंडेशन दिघी पोर्ट लिमिटेड यांच्यातर्फे आदगाव ग्रामपंचायतीत मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले. याचा आजुबाजूच्या परिसरातील १६३ जणांनी लाभ घेतला.

सुरुवातीला सर्व उपस्थितांचे स्वागत करण्यात येऊन शिबिराला सुरुवात करण्यात आली.अलिबाग येथील त्वचारोग तज्ञ, महिला रोग तज्ञ व जनरल फिजिशियन यांनी ग्रामस्थांना तपासणी करून मोफत औषधोपचार दिले. समुद्रकिनारी राहणाऱ्यांमध्ये आढळणाऱ्या त्वचेच्या आजारांवर तसेच वृद्धांच्या सांधेदुखी, गुडघेदुखीवर उपचार करण्यात आले.याचा १६३ जणांनी लाभ घेतला.

यावेळी “गावकऱ्यांनी आरोग्यविषयक या सुविधा जास्तीत जास्त प्रमाणात लाभ करून घ्याव्यात. अशा उपक्रमांचा लाभ भविष्यातही सातत्याने मिळत राहील,”असे अदानी फाऊंडेशन चे अवधूत पाटील यांनी सांगितले.

ग्रामपंचायतीचे सरपंच यमुना जाधव,उपसरपंच संदीप गोरिवले व ग्रामपंचायत कर्मचारी यांचे सहकार्य लाभले तर शिबिराच्या यशस्वितेसाठी ग्रामसखी अरुंधती पिळकर, प्राजक्ता आडुळकर व नम्रता दिघीकर यांनी विशेष परिश्रम घेतले.